रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ४३
www.ramprahar.com

◆ शनिवार, २९ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



पनवेल : बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेला रक्षाबंधन सण शुक्रवारी अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या मंगलदिनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबातील भावांना त्यांच्या बहिणींनी औक्षण करून राखी बांधली आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. (अधिक छायाचित्रे पान ३ वर...)




# रायगडात निरोगी आणि स्वच्छ गणेशोत्सवाचा संकल्प

## जि.प.चा पुढाकार; डेंग्यू प्रतिबंधावर भर

**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषदेकडून गणरायासाठी सज्ज रायगड या अभियानांतर्गत निरोगी व स्वच्छ गणेशोत्सव हा उपक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १४ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवापूर्वी आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्या, ग्रामपंचायतींना दिल्या आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची बैठक नुकतीच पार पडली या बैठकीत कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार गणेशोत्सवाच्या काळात गावातील रस्ते, चौक,




सार्वजनिक ठिकाणे, शाळा, अंगणवाडी, मंदिर परिसर तसेच गणेश मंडप परिसराची विशेष स्वच्छता करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नाले व गटारे स्वच्छ करून पाण्याचा निचरा सुरळीत ठेवण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा तातडीने उचलून योग्य विल्हेवाट लावण्यास सांगण्यात आले आहे.

डेंग्यूच्या पार्श्वभूमीवर विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश आहेत. घरांच्या व सार्वजनिक परिसरातील पाणी साचणारी ठिकाणे शोधून ती तातडीने हटवावीत. टायर, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिकच्या वस्तू, डबे, कुंड्या आदींमध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घेण्याबरोबरच आठवड्यातून किमान एक दिवस ‘कोरडा दिवस’ पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गणेश विसर्जन घाटांची पूर्वपाहणी करून स्वच्छता व दुरूस्तीची कामे उत्सवापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गाळ, झुडपे व कचरा हटविणे, रस्ते व पायवाटा सुस्थितीत करणे, प्रकाशयोजना, बॅरिकेडिंग व मार्गदर्शक फलक लावणे तसेच निर्माल्य संकलन व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### संयुक्त बैठकांद्वारे तयारीचा आढावा

जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समिती स्तरावर लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या सहभागातून संयुक्त बैठका घेऊन गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यात येणार आहे. डेंग्यूची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडीबरोबरच गणेश मंडळांच्या ठिकाणी माहितीपत्रके व फलक लावण्यात येणार आहेत.



## सरकार ॲक्शनमध्ये! साखरेच्या साठेबाजीला बसणार चाप

**नवी दिल्ली** : सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी सप्टेंबरपासून साखर कारखान्यांना दर महिन्याला मिळणारा विक्री कोटा बंद करून दर १५ दिवसांनी दिला जाणार आहे. बाजारात साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध असणे आणि साठेबाजीला चाप लावण्यासाठी केंद्र सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. त्याचप्रमाणे देशात साखरेची कमतरता नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे. नव्या नियमानुसार साखर कारखान्यांना पंधरवड्याला विक्री कोटा मिळणार आहे. पहिल्या आठवड्यातच त्यातील ४० टक्के साखर विक्री करावी लागणार आहे, तर उर्वरित साखर त्याच्या पुढील आठवड्यांत विकावी लागणार आहे. याशिवाय कारखान्यातून साखर विक्री केल्यानंतर पुढच्या सात दिवसांच्या आत ती रवाना करावी लागणार आहे. त्यामुळे पुरवठा साखळीचा वेग वाढून बाजारात साखर पुरेशा प्रमाणात उपलब्ध होईल.






**पनवेल : येथील महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी कळंबोली सेक्टर १२ येथील स्मशानभूमीला भेट देऊन परिसराची पाहणी केली. स्थायी समिती सभापती बबन मुकादम, भाजप शहराध्यक्ष अमर पाटील, प्रभाग समिती ‘अ’चे सभापती रवींद्र भगत, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, नगरसेवक राजेंद्र शर्मा, शहर मंडळ सचिव निलेश भोईर, प्रभाग समिती ‘अ’चे अधीक्षक अरविंद पाटील, युवा मोर्चा शहराध्यक्ष गौरव नाईक आदी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक परेश ठाकूर यांनी नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.**

## नेपाळच्या महाप्रलयातील मृतांचा आकडा पाचशेवर

**काठमांडू : वृत्तसंस्था**

हिमस्खलनामुळे नेपाळमध्ये आलेल्या महापुरात आतापर्यंत ५३८ जणांचा मृत्यू झाला आहे. शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून ११७ पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. त्यापैकी ८५ पर्यटक हे भारतीय आहेत.

नेपाळच्या रसुवा जिल्हा आणि आसपासच्या परिसरात आलेल्या विनाशकारी महापुरात १,५४५हून अधिक लोक जखमी झाले आहेत. याशिवाय नेपाळमध्ये अजूनही ८२६ नागरिक बेपत्ता आहेत, तर तिबेटच्या भागात ५५८ जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे.

## निवडक

### दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सुनावणी पूर्ण

**मुंबई** : गेल्या सहा वर्षांपासून चर्चेत असलेल्या दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरणातील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात पूर्ण झाली असून दोन्ही बाजूंचे युक्तिवाद संपल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. न्यायाधीश कोतवाल यांनी या प्रकरणाचा निकाल राखून ठेवत लवकरच निर्णय दिला जाईल, असे संकेत दिले आहेत.

### रोह्यात सर्पदंशाने कामगाराचा मृत्यू

**धाटाव** : रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रोहा डायकेम कंपनीत नॅचरल प्लांटच्या बॅगा शिफ्टिंगचे काम करीत असताना सर्पदंश झाल्याने दगडु भोस्तेकर (५५, रा. विठ्ठलवाडी, भुवन, ता. माणगाव) या कामगाराचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणाची फॅक्टरी इन्स्पेक्टरने चौकशी करून जबाबदार संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भाजपच्या सचिन मोरे यांनी केली आहे.






# शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नवे तंत्रज्ञान आवश्यक -मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे, मात्र शेतकऱ्याला कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी नव्या तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था उभी करावी लागेल. त्यासाठी कृषी क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेऊन आधुनिकीकरण, नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाचा वापर करून उत्पादन खर्च कमी करीत उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी महाविद्यालयांनी महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २८) केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या दिंडोरी तालुक्यातील मौजे चाचडगाव येथील कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, नाशिक महानगरपालिकेच्या



महापौर हिमगौरी आहेर-आडके आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक असून त्यांची गुंतवणूक करण्याची क्षमता कमी आहे. शेतीचा उत्पादन खर्च वाढतो आहे. या तुलनेत हमीभावामुळे शेतकऱ्यांना विशेष लाभ मिळत नाही. यातून मार्ग काढण्यासाठी शेती क्षेत्रातील संशोधनाला चालना द्यावी लागेल आणि हे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या महाविद्यालयांची आवश्यकता आहे. या महाविद्यालयातील सुविधा लक्षात घेता नाशिकमध्ये भविष्यात होणाऱ्या कृषी संशोधनात हे महाविद्यालय अग्रेसर असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.नाशिकच्या कृषी प्रगतीचा विशेष उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. येथील शेतकरी अत्यंत मेहनती आहेत. आदिवासी भागातही विविध वनोपज तयार केले जाते. देशाच्या द्राक्ष निर्यातीच्या ८० टक्के निर्यात नाशिक जिल्ह्यातून होते. नाशिक जिल्ह्यातला कांदा संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. फायदेशीर शेतीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीची क्षमता कमी झाली आहे. म्हणून राज्य शासन कमी खतांच्या वापरात अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला चालना देत असल्याचे त्यांनी नमूद केले.नवे तंत्रज्ञान, नवीन संशोधन याच्या साह्याने कृषी महाविद्यालयांनी जमिनीचा पोत ओळखून खतांचा वापर करण्याचे मार्गदर्शन केल्यास शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल.

## गणेशमूर्ती आगमनासाठी पोलीस बंदोबस्त वाढवा हिंदुत्ववादी संघटनांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक तसेच घरगुती गणेशमूर्तींच्या आगमनादरम्यान आवश्यक पोलीस बंदोबस्त आणि प्रतिबंधात्मक सुरक्षा व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल, कोकण प्रांत यांच्या वतीने नवी मुंबई पोलीस आयुक्तांकडे करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे कोकण प्रांत महामंत्री उद्धवराव खराडे यांनी दिली.

सध्या नवी मुंबईतील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तींचे आगमन सुरू असून काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर घरगुती गणेशमूर्तींचेही आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी आगाऊ प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील प्रत्येक पोलीस ठाण्याने आपल्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांशी समन्वय साधून मूर्ती आगमनाची तारीख, वेळ व मार्गाची माहिती घ्यावी. गर्दी व स्थानिक परिस्थितीनुसार पोलीस बंदोबस्त, बीट मार्शल, मोबाइल पेट्रोलिंग, उपलब्ध सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून देखरेख वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पडम कोळीवाड्यात नारळी पौर्णिमा उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पडम कोळीवाड्यात गुरुवारी नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळी गावातील ग्रामस्थांनी व तरुणांनी नारळ अर्पण करण्याच्या कार्यक्रमाची तयारी केली. हातगाडीवर नारळ सजवून ठेवले होते. सायंकाळी ५ च्या सुमारास गावाच्या मध्यभागी आरती घेऊन मिरवणुकीस सुरुवात केली.



पाश्चात्त्य संगीतावर ठेका धरत कुंडलिका नदीपर्यंत मिरवणूक काढण्यात आली. लहान मुले, ग्रामस्थ, विशेष करून महिला वर्गाने पारंपरिक वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभाग घेतला. सायंकाळी उशिरा कुंडलिका नदीत नारळ अर्पण करण्यात आले.दर्याराजाचे पूजन करून निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा 'नारळी पौर्णिमा' हा सण रोहा तालुक्यातील पडम, खारापटी, निडी, खारगाव, अष्टमी कोळीवाडा, कोपरा कोळीवाड्यांमध्ये मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. श्रावण पौर्णिमेच्या दिवशी साजरा होणाऱ्या या सणाने संपूर्ण कुंडलिका नदीकाठचा भाग पारंपरिक व पाश्चात्त्य वाद्यवृंद आणि कोळीगीतांनी दुमदुमून गेला होता.

## नागावमध्ये श्रेयश पाटील ठरले 'मानाच्या नारळफोडी'चे मानकरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव येथे समीर राणे मित्र मंडळातर्फे आयोजित 'मानाची नारळफोडी स्पर्धा २०२६' मध्ये अलिबाग येथील श्रेयश पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावला. समीर राणे मित्र मंडळ, नागाव यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मानाची नारळफोडी स्पर्धा २०२६' मध्ये अलिबाग येथील श्रेयश पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळवला. विजेत्या श्रेयश पाटील यांना ५५ हजार ५५५ रुपये रोख व भव्य आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.




गेली १७ वर्षे सातत्याने सुरू असलेली ही नारळफोडी स्पर्धा रायगड जिल्ह्यातील मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखली जाते. सुमारे १७ वर्षांपूर्वी माऊली फाउंडेशनचे अध्यक्ष समीर राणे यांनी गावातील पारंपरिक उत्सवाची परंपरा जपण्याबरोबरच गावातील सर्व नागरिकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने या स्पर्धेची मुहूर्तमेढ रोवली. सातत्यपूर्ण आयोजनामुळे या स्पर्धेला आज मोठे व्यासपीठ प्राप्त झाले आहे.यंदाच्या स्पर्धेत अलिबागचे श्रेयश पाटील प्रथम, सतीश ठाकूर (ठाकूर आळी) द्वितीय, तर विजय घरत (कोपर गल्ली) तृतीय क्रमांकावर राहिले. सचिन राणे (ठाकूर आळी) यांनी चौथा क्रमांक पटकावला. पाचव्या ते आठव्या क्रमांकाच्या विजेत्यांनाही रोख पारितोषिकांसह आकर्षक ट्रॉफी देण्यात आल्या.

नारळी पौर्णिमेनिमित्त गावोगावी तसेच गल्ली-गल्लीत नारळफोडीच्या स्पर्धा आयोजित केल्या जात असल्या, तरी १७ वर्षांची परंपरा असलेली समीर राणे मित्र मंडळाची 'मानाची नारळफोडी स्पर्धा' ही आजही मानाची आणि प्रतिष्ठेची स्पर्धा म्हणून आपले वेगळे स्थान टिकवून आहे. स्पर्धेला मिळणारा वाढता प्रतिसाद हेच या उपक्रमाच्या यशाचे द्योतक असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या स्पर्धेच्या माध्यमातून तरुणांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळत असून, गावातील नागरिकांमध्ये एकोपा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. आगामी काळातही ही परंपरा अधिक भव्य स्वरूपात सुरू ठेवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

## 'रोटरी'तर्फे विद्यार्थ्यांना मोफत आयडियल स्टडी बडी ॲपचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

वरंध येथील छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना 'आयडियल स्टडी बडी' शैक्षणिक ॲपचे मोफत वाटप करण्यात आले. छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरंध, ता. महाड येथे रोटरी क्लब ऑफ महाडच्या वतीने इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना १,१३,६०० रुपये किंमतीच्या 'आयडियल स्टडी बडी' शैक्षणिक ॲपचे मोफत वाटप करण्यात आले.



हे डिजिटल ॲप महाराष्ट्र बोर्डाच्या इंग्रजी, मराठी आणि सेमी-इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले असून, ते मोबाईल, टॅबलेट आणि डेस्कटॉपवर सहज चालते. या ॲपमध्ये अभ्यासक्रमावर आधारित सर्वसमावेशक अभ्यास साहित्य, परस्परसंवादी लर्निंग मॉड्यूल्स, उजळणी पेपर्स आणि प्रश्नसंच समाविष्ट आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या बोर्ड परीक्षेची तयारी करता येईल.

कार्यक्रमास विद्यालयाचे सभापती शहाजी बापू देशमुख, शाळा समिती सदस्य सुभाष बापूराव देशमुख तसेच मुख्याध्यापक रघुनाथ वन्नेरे उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ महाडचे प्रेसिडेंट राजीव वनारसे, सेक्रेटरी नितीन जोशी, माजी अध्यक्ष राजेंद्र मेहता, माजी अध्यक्ष सुधीर मांडवकर आणि माजी सेक्रेटरी संतोष ग्रामोपाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाला विशेष डिजिटल सहकार्य केल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे रोटरी क्लब ऑफ निगडी, पुणेचे प्रेसिडेंट शशांक फडके यांचे आभार मानण्यात आले. सूत्रसंचालन सोनाली देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन संपदा खातू यांनी केले.

## मोहोपाडा बाजारात रानभाज्यांची रेलचेल



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्रावण महिना सुरू होताच रसायनी परिसरातील मोहोपाडा बाजारपेठेत विविध प्रकारच्या रानभाज्यांची आवक सुरू झाली असून बाजारात सध्या रानभाज्यांची चंगळ पाहायला मिळत आहे. पावसाळ्यात डोंगरदऱ्या, शेतजमिनी आणि जंगल परिसरात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या या रानभाज्या खवय्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

मोहोपाडा बाजारात टाकळा, कवळा, कुर्ला, तेरी, आळू, कर्टुले, शेवळा, भारंगी, माठ, कुरडू, शेकटा आदी विविध रानभाज्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत. स्थानिक नागरिकांकडून या पारंपरिक रानभाज्यांना विशेष पसंती दिली जात आहे. याबाबत माहिती देताना निसर्ग अभ्यासक, पक्षीनिरीक्षक व लेखक अनिल दाभाडे यांनी सांगितले की, श्रावण महिन्यापासून गौरी-गणपती सणापर्यंत मोहोपाडा बाजारात विविध रानभाज्या उपलब्ध होत असतात. वर्षभरात प्रामुख्याने पावसाळ्यातच या रानभाज्या मिळत असल्याने त्यांना विशेष महत्त्व आहे.पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग असलेल्या या रानभाज्यांमध्ये विविध नैसर्गिक गुणधर्म असल्याचे जाणकारांकडून सांगितले जाते.

पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या या स्थानिक रानभाज्यांचा आस्वाद किमान एकदा तरी घ्यावा, असे जुनी जाणकार मंडळी सांगत असल्याचे दाभाडे यांनी नमूद केले. रानभाज्यांमुळे ग्रामीण भागातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीची आठवण ताजी होत असून, नव्या पिढीलाही या स्थानिक वनस्पती आणि पारंपरिक पाककृतींची ओळख होत आहे. त्यामुळे श्रावणात मोहोपाडा बाजारात येणाऱ्या या रानभाज्या नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत.

## विंधाणेतील शाळेत रक्षाबंधन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरेची ओळख व्हावी या उद्देशाने बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधाणे येथे रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वाची माहिती देऊन करण्यात आली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, रक्षाबंधन केवळ राखी बांधण्याचा सण नसून प्रेम, काळजी, आदर आणि एकमेकांच्या सुख-दुःखात साथ देण्याचे प्रतीक आहे. विद्यार्थिनींनी सुंदर आणि रंगीबेरंगी राख्या तयार करून आणल्या, तर विद्यार्थ्यांनी आनंदाने त्या राख्या बांधून घेतल्या. काही विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनानिमित्त शुभेच्छा व संदेशही दिले. पारंपरिक वेशभूषेमुळे कार्यक्रमाचे वातावरण अधिक आनंददायी आणि आकर्षक झाले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या भावंडांशी प्रेमाने आणि आदराने वागण्याचा संदेश दिला. तसेच कुटुंबातील नातेसंबंध जपणे, एकमेकांना मदत करणे आणि परस्परांमध्ये प्रेम व विश्वास वाढविणे यांचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम आनंदमय झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख होण्याबरोबरच भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे महत्त्वही समजले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## कोपरखैरणेतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उपाययोजना

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणेतील वाहतूक समस्येचा प्रश्न गंभीर बनला असून वाढती लोकसंख्या आणि घरटी वाढणारी वाहने यामुळे शहराची चहूबाजूंनी कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर ठोस उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि लोकप्रतिनिधींनी संयुक्त पाहणी केली.

नवी मुंबई शहरात कोपरखैरणे हा सर्वाधिक लोकसंख्येचा विभाग म्हणून ओळखला जातो. सोबत या विभागातील वाहतूक समस्येनेदेखील डोके वर काढले आहे. याबाबत नगरसेविका व विधी समिती सभापती सायली शिंदे यांनी वाहतूक पोलिसांना पत्र देत उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्या पत्राला अनुसरून वाहतूक पोलीस, पालिका अधिकारी तसेच नगरसेविका सायली शिंदे, नगरसेवक संदीप म्हात्रे व रॉबिन



मढवी यांनी विभागाची पाहणी केली. यावेळी शाळेभोवती असणारी वाहतूक समस्या कशी सोडविता येईल यावर भर दिल्याचे नगरसेविका शिंदे यांनी सांगितले.

वाहतूक विभागाचे अधिकारी योगेश शिंदे, वॉर्ड ऑफिसर तसेच संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत कोपरखैरणे परिसरातील प्रमुख रस्ते, चौक आणि वाहतूक कोंडीच्या ठिकाणांची नगरसेवकांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान अनधिकृत पार्किंग, अवजड वाहनांची वर्दळ, पीक अवर्समधील वाहतूक कोंडी आणि पादचाऱ्यांसाठी अडथळा ठरणारे पार्किंग याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शाळांच्या परिसरातील वाहतूक व्यवस्थेबाबत संबंधित शाळा प्रशासनाशी समन्वय साधून नियोजन करण्यात येत आहे. शाळांच्या ठिकाणी नो पार्किंग झोन निश्चित करण्यासोबतच विद्यार्थी व पालकांची सुरक्षितता लक्षात घेऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जाणार आहेत.

सम-विषम पार्किंग उपाययोजना करण्याचे नियोजन यावेळी आखण्यात आले. रस्त्यांवरील अनावश्यक पार्किंग कमी करून वाहतुकीसाठी अधिक जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. फुटपाथ पादचाऱ्यांसाठी मोकळे ठेवणे हीदेखील महत्त्वाची बाब आहे. नागरिकांना सुरक्षितपणे चालता यावे यासाठी फुटपाथवरील अडथळे आणि अनधिकृत पार्किंगवर आवश्यक ती कारवाई करण्याबाबत पालिका अधिकाऱ्यांना यावेळी सूचना देण्यात आल्या. वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे सायली शिंदे यांनी सांगितले.

# आगरी-कोळी समाजाचा सांस्कृतिक सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल आगरी-कोळी समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला भव्य सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम गुरुवारी (दि. २७) वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात अत्यंत उत्साही आणि मंगलमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार मंदा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना संबोधित करताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण आगरी-कोळी समाजाला व नागरिकांना नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी विरोधी पक्षनेते नामदेव भगत यांच्यासह अखिल आगरी-कोळी समाज प्रबोधन ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले होते. सोहळ्यात आगरी-कोळी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या आगरी कोळ्यांची या विशेष प्रबोधनात्मक उपक्रमाचे सादरीकरण हर्षदा म्हात्रे व पायल पाटील यांनी केले. त्यांच्या या बहारदार सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. आई एकवीरा, कुलदैवत श्री खंडोबा आणि कुलदेवी तुळजा भवानी यांच्या नियोजित मंदिराच्या संकल्पनेला तसेच समृद्ध आगरी-कोळी संस्कृती व परंपरेला उजाळा देणाऱ्या या सोहळ्याला समाजबांधवांसह नागरिकांनी प्रचंड संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमावेळी रमाकांत भगत, इंदुमती भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक, नगरसेविका आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तक्का परिसरात नारळी पौर्णिमा उत्सव जल्लोषात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या आणि कोळी बांधवांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या नारळी पौर्णिमा उत्सवाचा उत्साह तक्का परिसरात मोठ्या जल्लोषात पाहायला मिळाला. तक्का ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात संपूर्ण परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नारळी पौर्णिमेनिमित्त तक्का येथे विविध सांस्कृतिक आणि पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांपासून ते महिलांपर्यंत सर्वांनी केलेला पारंपरिक कोळी पेहराव कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला. पारंपरिक वेशभूषेत नटलेल्या महिला व बालकांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि कोळीगीतांच्या तालावर ठेका धरत महोत्सवाचा आनंद द्विगुणित केला. मुख्य सोहळ्यात पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या हस्ते विधीवत पूजाअर्चा करून दर्याला नारळ अर्पण करण्यात आला.

यावेळी प्रभाग समिती ड चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंझारराव, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, गजानन घाडगे, उमेश इनामदार, रुपेश नागवेकर, रघुनाथ बहिरा, प्रभाकर बहिरा, हिमेश बहिरा यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





पनवेल : रक्षाबंधनाच्या मंगलमय पर्वानिमित्त शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांना भगिनींनी राखी बांधून शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रतिभा भोईर, जयश्री पाटील, पूनम पाटील, स्वराली कांडपिळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे औक्षण करीत राखी बांधली व त्यांच्याकडून सदैव पाठीशी राहून रक्षण करण्याचे वचन घेतले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व भगिनींच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याचे आश्वासन देत रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. पत्नी वर्षा ठाकूरही उपस्थित होत्या.



पनवेल : रक्षाबंधनाचा पवित्र सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. या मंगलसमयी वर्षा प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांना राखी बांधून सणाचा आनंद द्विगुणित केला.



पनवेल : येथील महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी गुरुवारी कोळी समाजाच्या वतीने आयोजित नारळी पौर्णिमा सोहळ्यास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. सोबत भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव आणि इतर मान्यवर.











पनवेल : बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनानिमित्त शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबातील भावांना त्यांच्या बहिणींनी औक्षण करून प्रेमाची राखी बांधली आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कौटुंबिक सोहळ्यात श्रीधरशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, हिराशेठ ठाकूर, नारायण ठाकूर, पांडुरंग ठाकूर, सुहास ठाकूर आणि चंद्रकांत ठाकूर यांना त्यांच्या भगिनी अनुसया वास्कर, राधाबाई ठाकूर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, प्रमिला वास्कर, पदुबाई म्हात्रे, कमलाबाई म्हात्रे, सीताबाई भोईर आणि ठकुबाई घरत यांनी राखी बांधून रक्षाबंधनाचा आनंद द्विगुणित केला.

## पूजा म्हात्रेची प्रशासकीय सेवेत झेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर धाकटा खांदा गावची लेक पूजा बाळकृष्ण म्हात्रे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करत राज्य कर निरीक्षकपदी निवड मिळविली आहे.



शासकीय सेवेत जाण्याचे ध्येय ठेवून पूजा यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य वेळेचे नियोजन आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश मिळविले. पूजा यांच्या यशाची माहिती मिळाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे पनवेल शहराध्यक्ष सतीश पाटील यांनी धाकटा खांदा येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांनी पूजा यांच्या कर्तृत्वाचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ‘सीकेटी’त स्वच्छतादूतांसोबत अनोखे रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रक्षाबंधनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. २७) सकाळी स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतादूत कृतज्ञता सोहळा रक्षाबंधन या कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा केला. गेली कित्येक वर्षे स्काऊट गाईड हा उपक्रम शाळेत राबविला जात आहे. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त, सामाजिक बांधिलकी, देशप्रेम या मूल्यांचे महत्त्व समजावे या उद्देशाने हा उपक्रम शाळेत राबविला जातो.

स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी उपस्थित स्वच्छतादूतांना राखी बांधून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व सर्वांसाठी ही अभिमानाची बाब आहे, हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी स्वतःचे मनोगत व्यक्त केले, तसेच नृत्य व गीत सादर केले. स्वच्छता शपथ गायत्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिली. एक अनोखा उपक्रम विद्यालयात साजरा करण्यात आला. अशा अनोख्या उपक्रमाची संपूर्ण कल्पना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांची होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वच्छता निरीक्षक संदीप जाधव व सुमित घरत उपस्थित होते. त्याचप्रमाणे इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, अशोक पाटील, गायत्री पाटील, चैताली सुर्वे, स्नेहा पाटील तसेच १५ स्वच्छतादूत, स्काऊट गाईडचे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विनोद जोशी जिल्हा शिक्षण व क्रीडा समितीवर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल रायगड प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा सरचिटणीस विनोद जोशी यांची जिल्हा शिक्षण व क्रीडा समितीच्या निमंत्रित शिक्षक प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रात तसेच शिक्षक संघटनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

विनोद जोशी यांची शिक्षण क्षेत्रातील संघटनात्मक कारकीर्द प्रदीर्घ असून शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. शिक्षकांच्या समस्या शासन व प्रशासनाच्या स्तरावर मांडण्यासोबतच शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी भरीव योगदान दिले आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे विनोद जोशी यांना नेहमीच सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जोशी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे कार्य केले आहे तसेच उरणचे आमदार महेश बालदी आणि महानगरपालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांचेही त्यांना संघटनात्मक कार्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.



जोशी यांची निवड झाल्याबद्दल समितीच्या सभेत जिल्हाध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील तसेच शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या नियुक्तीबद्दल अखिल रायगड प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीनेही जोशी यांचे अभिनंदन करण्यात आले. संघटनेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी आणि शिक्षकांच्या हितासाठी जोशी यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रमोद पाटील, किशोर मोहिते, ज्योती कडूनकर, रंजना केणी, जिल्हाध्यक्ष सोपान चांदे, उपाध्यक्ष आदिनाथ पाटील, अनिल सारंगी, दीपक कडूनकर, दत्ता शिर्के, उमेश म्हात्रे, मोहन पाटील, शेखर बोरकर, राकेश पाटील, ज्योती भोपी, धनंजय केणी, ज्ञानेश आलदर, सुवर्णा रोहोकले, सतीश वाघ, अविनाश कोळेकर, सीताराम जाधव, परशुराम मोरे, सुनील जंगम, राजेंद्र नाझरे आदी पदाधिकारी, शिक्षक व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अग्निशमनच्या जवानांसोबत इनरव्हीलचे रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रक्षाबंधनाच्या पर्वानिमित्त इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीतर्फे अग्निशमन दलातील अधिकारी व जवानांसोबत रक्षाबंधनाचा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. समाजाच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या अग्निशमन दलातील अधिकारी व जवानांप्रति कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याच्या उद्देशाने क्लबच्या सदस्यांनी त्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.



नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असणाऱ्या अग्निशमन दलाच्या धाडसी सेवेला या उपक्रमातून मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमास नवी मुंबईचे चीफ फायर ऑफिसर प्रवीण बोडके तसेच पनवेलचे सब फायर ऑफिसर शुभम राठोड यांच्यासह अग्निशमन दलाचे सुमारे २० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या वतीने अध्यक्षा स्नेहल कल्याणकर, ट्रेझरर ध्वनी टन्ना, एडिटर प्रतिभा दांगी तसेच सदस्य शुभांगी दीक्षित, ज्योती ठक्कर, दुर्गा चौधरी, गौरी धात्रक, शीला शाह आणि नम्रता बंथिया उपस्थित होत्या. रक्षाबंधनाचा हा उपक्रम भाऊ-बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित न राहता समाजातील विविध घटकांमध्ये स्नेह, कृतज्ञता, सुरक्षितता आणि बंधुभावाचा संदेश देणारा ठरला.

## संपादकीय

# मुदतवाढ पण आग्रह कायम

रिक्षा-टॅक्सी हे प्रवाशांशी थेट संवाद साधणारे सार्वजनिक वाहतुकीचे साधन असल्याने या चालकांना जुजबी तरी मराठी भाषा यावी हा राज्य सरकारचा निर्णय योग्य आहे. मात्र कोणताही निर्णय राबविताना त्याची अंमलबजावणी वास्तव परिस्थिती नीट लक्षात घेऊन होणे महत्त्वाचे असते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात घेतलेल्या मुदतवाढीच्या निर्णयातून हाच समतोल दिसून येतो.

**राज्याच्या परिवहन विभागाने व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांना मराठीचे व्यावहारिक ज्ञान आवश्यक केले व त्यानंतर अमराठी चालकांना मराठी शिकण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्थाही करण्यात आली. परिवहन विभागाच्या माहितीनुसार मोठ्या संख्येने अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठीच्या वर्गांमध्ये हजेरी लावली. परंतु नियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर मात्र परिस्थिती वेगळी दिसू लागली. संबंधित तपासणी मोहिमेनंतर अनेक चालकांना मराठीचे पुरेसे व्यवहारिक ज्ञान नसल्याबद्दल नोटिसा बजावण्यात आल्या. नोटिसा आणि कारवाईच्या भीतीमुळे चालकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आणि मुंबईतील रिक्षा चालकांनी त्याविरोधात संप पुकारला. वास्तविक मुख्यमंत्री फडणवीस यांनी परिस्थिती लक्षात घेऊन आधीच स्पष्ट केले होते की चालकांना मराठीचे तज्ज्ञ होण्याची अपेक्षा नाही. प्रवाशांशी दैनंदिन व्यवहार करता येईल एवढेच ज्ञान अपेक्षित आहे. त्यानंतर गुरुवारी रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. अमराठी चालकांची मराठी शिकण्याची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र विविध वयोगटांतील आणि शिक्षणापासून बरीच वर्षे दूर असलेल्या चालकांना अल्पावधीत नवी भाषा शिकणे कठीण असल्याने अधिक वेळ देण्याची मागणी केली. या मागणीवर मुख्यमंत्र्यांनी घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सी चालकांना किमान जुजबी मराठी बोलता आली पाहिजे याला आमचे पूर्ण समर्थन आहे. तसा प्रयत्न आम्ही करत आहोत असे या संघटनांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सांगितले. मात्र वेगवेगळ्या वयातल्या या चालकांना एवढ्या कमी वेळात हे शक्य नाही. यासाठी आम्हाला कालावधी वाढवून द्यावा अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे एक वर्षाची मुदतवाढ याला देण्यात येईल, दरम्यानच्या काळात कोणतीही कारवाई केली जाणार नाही असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी यावर केला. ही मुदतवाढ म्हणजे मराठीच्या आग्रहातून माघार नव्हे. उलट, नियम अधिक परिणामकारकपणे रुजविण्याची ही संधी आहे. भाषा काही दिवसांत पाठ करून आत्मसात करता येत नाही. विशेषतः वेगवेगळ्या वयोगटांतील, विविध शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या आणि रोजीरोटीसाठी दिवसभर रस्त्यावर असलेल्या चालकांना एक नवीन भाषा शिकण्यासाठी वेळ, वर्ग आणि योग्य साहित्य देणे आवश्यक आहे. सरकारने एक वर्षाचा कालावधी देताना वर्ग आणि अभ्याससाहित्य उपलब्ध करून देण्याचा मार्ग स्वीकारला आहे. राज्याच्या सार्वजनिक जीवनात मराठी भाषेला योग्य सन्मान मिळावा हा आग्रह स्वाभाविक आहे. मराठीचा सन्मान आणि चालकांची उपजीविका यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोन्हींचा समतोल साधणे हेच याबाबतीत योग्य ठरते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तोच मार्ग स्वीकारला आहे. आता चालकांनीही या विश्वासाला सकारात्मक प्रतिसाद देत पुढील वर्षभरात जुजबी नव्हे तर प्रवाशांशी आत्मविश्वासाने संवाद साधता येईल इतकी मराठी शिकण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. मराठीच्या आग्रहातून कुणाची रोजीरोटी हिरावण्याऐवजी, कुणावर दडपण व भीतीतून ताण येण्याऐवजी त्यातून संवादाचा सेतू उभारला गेला पाहिजे. त्यातच या निर्णयाचे खरे यश असेल.**

# माणूस : धरित्रीचा विचारयात्री

धरित्रीच्या विशाल कुशीत असंख्य जीव जन्माला आले, जगले आणि काळाच्या ओघात नाहीसे झाले. या अफाट जीवसृष्टीत माणूसही एका दिवसात निर्माण झाला नाही. तो अचानक पृथ्वीवर अवतरला नाही. लाखो वर्षांच्या जैविक उत्क्रांतीतून त्याचे शरीर, मेंदू, वर्तन आणि सामाजिक जीवन हळूहळू बदलत गेले.

विविध साधनांनी माणसाला निसर्गाने दिलेल्या वस्तूंचा केवळ उपयोग करण्यापासून त्या वस्तूंना आपल्या गरजेनुसार बदलण्याची क्षमता दिली. अनुभवातून शिकण्याची प्रक्रिया सुरु झाली. एखादे फळ खाल्ले आणि त्याने त्रास झाला, हा अनुभव. पुढे ते फळ टाळले, ही स्मृती. दुसऱ्याला सांगितले की हे फळ खाऊ नको, ही माहिती. कोणते फळ खाण्यायोग्य आणि कोणते विषारी हे समजले, हे ज्ञान. आणि 'हे असे का होते?' असा प्रश्न पडला, तो विचार. अशा प्रकारे माणसाच्या बौद्धिक प्रवासाची एक महत्त्वाची साखळी तयार होत गेली. अनुभव, स्मृती, माहिती, ज्ञान, प्रश्न, विचार, विवेक आणि कृती. ही साखळीच मानवी संस्कृतीच्या वाढीचा गाभा आहे. येथे 'ज्ञान म्हणजे माहितीचा साठा नव्हे. एखादी घटना घडली हे माहीत असणे म्हणजे माहिती; ती घटना कशी घडते, का घडते, तिचे परिणाम काय आहेत आणि त्या समजुतीचा योग्य उपयोग कसा करायचा हे समजणे म्हणजे ज्ञानाच्या दिशेने जाणे होय

मानवी इतिहासातील अग्नीचा शोध किंवा त्यावर नियंत्रण मिळवण्याची प्रक्रिया हा याच ज्ञानविकासाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा होता. अग्नीने उष्णता दिली, अंधार दूर केला, संरक्षण दिले आणि अन्न शिजवण्याची शक्यता निर्माण केली. नियंत्रित अग्नीचा नेमका आरंभ कधी झाला याबाबत संशोधन सुरू असले तरी अग्नीशी संबंधित पुरावे मानवी इतिहासातील महत्त्वाचा बदल दर्शवतात. अग्नीभोवती समूह एकत्र येऊ लागले असतील, अनुभवांची देवाणघेवाण झाली असेल, मोठ्यांकडून लहानांनी शिकले असेल आणि एखाद्या व्यक्तीचा अनुभव संपूर्ण समूहाच्या उपयोगी पडला असेल. अशा प्रकारे ज्ञान व्यक्तीच्या आयुष्यापुरते मर्यादित न राहता समूहाच्या सामूहिक स्मृतीत जाऊ लागले.

माणूस एकटा फार शक्तिशाली नव्हता; पण समूहात त्याची शक्ती वाढली. शिकार, अन्नवाटप, बालसंगोपन, संरक्षण आणि संकटांचा सामना करण्यासाठी सहकार्य आवश्यक होते. काही पुराव्यांतून प्राचीन मानवसमूहांमध्ये जखमी किंवा दुर्बल व्यक्तींची काळजी घेतली गेल्याचे संकेत मिळतात. यावरून मानवी जीवनात केवळ स्पर्धाच नव्हे, तर सहकार्य आणि सामाजिक काळजीही महत्त्वाची होती, असे दिसते.

याच काळात माणसाच्या मेंदूच्या क्षमतांमध्येही दीर्घकाळात बदल होत गेले. मेंदूचा आकार वाढणे हा त्यातील एक भाग; पण नियोजन, स्मरण, समस्या सोडविणे, साधनांचा कल्पक वापर, सामाजिक संबंध समजून घेणे आणि भविष्यातील परिस्थितीची कल्पना करणे या क्षमतांचा विकास अधिक महत्त्वाचा आहे. आधुनिक मानवाचा मेंदू मोठा आणि गुंतागुंतीचा आहे; परंतु मानवी वैशिष्ट्य केवळ मेंदूच्या आकारात नाही. त्या मेंदूने अनुभव साठवले, अनुभवांची तुलना केली, भविष्याचा अंदाज बांधला, कल्पना केल्या आणि इतरांच्या अनुभवातून शिकण्याची क्षमता विकसित केली. म्हणूनच माणूस फक्त जगाशी जुळवून घेणारा जीव राहिला नाही; तो जगाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करणारा जीव बनला.

निसर्गाचे निरीक्षण करताना माणसासमोर हळूहळू नवे प्रश्न उभे राहिले असावेत. सूर्य रोज उगवतो आणि मावळतो. चंद्र बदलतो. ऋतू येतात-जातात. पाऊस पडतो. वीज चमकते. एखादा जन्मतो आणि एखादा मरतो. स्वप्न पडते. भीती वाटते. आनंद होतो. या सगळ्या अनुभवांचा अर्थ काय? त्या काळातील माणसाला आजचे वैज्ञानिक ज्ञान उपलब्ध नव्हते. त्यामुळे अज्ञाताचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्याने आपल्या अनुभवांवर आधारित कथा, प्रतीके आणि श्रद्धा निर्माण केल्या असाव्यात. याचा अर्थ त्या सर्व कल्पना 'चुकीच्या' होत्या असे सरसकट म्हणणेही योग्य नाही; त्या त्या काळातील मानवी ज्ञानाच्या मर्यादांमध्ये अज्ञाताला अर्थ देण्याचे प्रयत्न होते. नंतर त्या प्रश्नांची उत्तरे तपासण्याची अधिक चिकित्सक पद्धत विकसित झाली.

मृत्यू हा या प्रश्नांमधील सर्वांत गूढ प्रश्न होता. जन्म समोर दिसत होता, जीवन समोर दिसत होते. मृत्यूच्या अनुभवातून 'मृत्यूनंतर काय?' हा प्रश्न निर्माण झाला असावा. पुढे आत्मा, परलोक, पुनर्जन्म, कर्म आणि मुक्ती यांसारख्या संकल्पना विविध संस्कृतींमध्ये विकसित झाल्या. म्हणजेच माणसाच्या ज्ञानाची मर्यादा जिथे संपत होती, तिथून त्याची जिज्ञासा सुरू होत होती. या जिज्ञासेला दिशा देण्यासाठी भाषा अत्यंत महत्त्वाची ठरली. माणसाने संकेतांना अर्थ दिला, आवाजांना अर्थ जोडला आणि हळूहळू भाषिक संवाद विकसित झाला. भाषेने अनुभव सांगता आला, धोका कळवता आला, भूतकाळ आठवता आला आणि भविष्यासाठी योजना करता आली. भाषेमुळे एका व्यक्तीच्या मेंदूत असलेली कल्पना दुसऱ्या व्यक्तीच्या मनात पोहोचू शकली. त्यामुळे ज्ञानाची निर्मिती ही वैयक्तिक न राहता सामूहिक झाली. बोललेली भाषा जीवाश्मात टिकत नाही, त्यामुळे मानवाने नेमके कधी जटिल भाषा वापरायला सुरुवात केली हे निश्चित सांगता येत नाही

माणूस स्वतःला 'मी' म्हणून ओळखू लागला, पण जगण्यासाठी त्याला 'आपण' आवश्यक होते. कुटुंब, समूह, वस्ती आणि समाज निर्माण झाले. समूह वाढला तसे नियमांची गरज निर्माण झाली. माणसाच्या विचारांचा विषय आता केवळ निसर्ग राहिला नाही; तो समाज, संबंध, न्याय आणि जबाबदारी यांचाही विचार करू लागला. आज माणूस एका नव्या वळणावर उभा आहे. जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अवकाश संशोधन त्याच्यासमोर अभूतपूर्व शक्यता उघडत आहेत. एकेकाळी माणूस निसर्गाने बदलला. नंतर माणसाने निसर्ग बदलला. आता तो स्वतःलाच बदलण्याच्या क्षमतेच्या जवळ पोहोचत आहे. त्यामुळे भविष्यातील प्रश्न अधिक गंभीर आहेतत्याच्याकडे अधिक ज्ञान असेल, पण अधिक माणुसकी असेल का?

धरित्रीच्या कुशीतून निघालेला हा जीव एका विलक्षण प्रवासातून आज इथपर्यंत आला आहे. सुरुवातीला त्याच्यासमोर फक्त जगण्याचा प्रश्न होता. तो दोन पायांवर चालायला शिकला, हातांचा उपयोग केला. दगडाची साधने बनवली. अग्नीवर नियंत्रण मिळवले. समूहात राहायला शिकला. अनुभव साठवले. अनुभवांचे ज्ञान केले. भाषा निर्माण केली. प्रतीके आणि कला निर्माण केली. मृत्यूचा अर्थ शोधला. शेती केली. गावे आणि शहरे उभी केली. नियम आणि कायदे निर्माण केले. लेखनातून ज्ञान जतन केले. तत्त्वज्ञानातून सत्याचा शोध घेतला. विज्ञानातून निसर्गाचे नियम समजून घेण्याचा प्रयत्न केला. तंत्रज्ञानातून स्वतःची शक्ती वाढवली. आणि आता तो कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात प्रवेश करत आहे.म्हणून माणसाची उत्क्रांती ही केवळ शरीराच्या बदलांची कथा नाही. ती ज्ञानाच्या निर्मितीची आणि त्याच्या वापराची कथा आहे. अनुभवातून स्मृती, स्मृतीतून माहिती, माहितीमधून ज्ञान, ज्ञानातून प्रश्न, प्रश्नांतून विचार, विचारातून चिकित्सा, चिकित्सेतून विवेक आणि विवेकातून जबाबदार कृतीही मानवी विचारयात्रेची दिशा आहे. माणूस जसजसा बाह्य जग समजून घेत गेला, तसतसा त्याने स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्नही केला. म्हणून मानवी इतिहास म्हणजे निसर्गावर विजय मिळवण्याचा इतिहास नसून, निसर्गाला समजून घेण्याबरोबर स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्न आहे.

आज माणूस विश्वाचा शोध घेत आहे; पण त्याला अजूनही स्वतःला शोधायचे आहे. त्याच्यासमोर आजही प्रश्न आहेतमी कोण? माझे जगणे कशासाठी? चांगले जीवन कोणते? माणसाने माणसाशी कसे वागावे? निसर्गाशी माझे नाते काय? माझ्या ज्ञानाचा उपयोग कशासाठी? आणि मी ज्या जगाला बदलत आहे, ते पुढच्या पिढीसाठी कसे ठेवणार? कदाचित मानवी उत्क्रांतीची खरी कसोटी याच प्रश्नांच्या उत्तरांत दडलेली आहे. कारण माणूस फक्त विचार करणारा प्राणी नाही. तो आपल्या विचारांची चिकित्सा करू शकतो, स्वतःच्या चुका मान्य करू शकतो, नवीन ज्ञान स्वीकारू शकतो, जुना विचार बदलू शकतो, दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करू शकतो आणि आपल्या कृतींच्या परिणामांची जबाबदारी घेऊ शकतो. म्हणून माणसाच्या उत्क्रांतीचा पुढचा टप्पा अधिक शक्तिशाली होण्यात नसून अधिक विवेकी होण्यात आहे; अधिक माहिती मिळवण्यात नसून माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्यात आहे; अधिक ज्ञान मिळवण्यात नसून ज्ञानाला माणुसकीची दिशा देण्यात आहे. ज्या धरित्रीचे रक्षण करणे; ज्ञानाचा उपयोग माणुसकीसाठी करणेहीच त्याच्या विचारयात्रेची खरी दिशा आहे.

माणसाचा प्रवास अजून संपलेला नाही. तो आजही सुरू आहे. प्रत्येक पिढी नवे प्रश्न विचारते. प्रत्येक प्रश्न नव्या शोधाला जन्म देतो. प्रत्येक शोध नवे ज्ञान निर्माण करतो. नवे ज्ञान जुन्या विचारांना आव्हान देते. चिकित्सक विचारातून नवा विवेक जन्माला येतो आणि विवेकातून नव्या कृतीची दिशा मिळते. म्हणून मानवी इतिहासाचा सार एका सूत्रात सांगायचा झाला तर अनुभवातून स्मृती, स्मृतीतून माहिती माहितीतून ज्ञान, ज्ञानातून प्रश्न, प्रश्नातून विचार, विचारातून विवेक आणि विवेकातून माणुसकीपूर्ण कृती हीच माणसाची खरी उत्क्रांती. धरित्रीवर जन्मलेला माणूस केवळ तिचा रहिवासी नाही. तो तिचा निरीक्षक आहे, प्रश्नकर्ता आहे, शोधक आहे, अर्थ लावणारा आहे. आणि म्हणूनच तो आहे धरित्रीचा विचारयात्री.

**-डॉ.सुभाष वाघमारे,** संचालक,
साहित्यवेल वाचन प्रसार चळवळ, सातारा

## बदलते तंत्रज्ञान

### 'ॲपल'चा आयफोन १८ या दिवशी होणार लॉन्च...

ॲपलच्या नव्या उत्पादनांची आतुरतेने वाट पाहणाऱ्या ग्राहकांसाठी मोठी बातमी आहे. कंपनीने आपल्या आगामी



प्रॉडक्ट लॉन्च इव्हेंटची तारीख जाहीर केली आहे. कंपनीच्या माहितीनुसार ९ सप्टेंबर २०२६ रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे ग्रँड लॉन्च इव्हेंट आयोजित केला जाणार आहे. 'Surprise and Shine' या टॅगलाइनसह होणाऱ्या या इव्हेंटमध्ये iPhone १८ Pro आणि iPhone १८ Pro Max यांसारखे नवीन मॉडेल्स सादर केले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय Appleच्या पहिल्या फोल्डेबल iPhoneच्या लॉन्चबाबतही चर्चा सुरू आहे.

Appleचा हा विशेष कार्यक्रम ९ सप्टेंबर २०२६ रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्नियामधील Apple कंपनीच्या संकुलात असलेल्या Steve Jobs Theaterमध्ये होणार आहे. हा कार्यक्रम अमेरिकेत सकाळी १० वाजता सुरू होईल. भारतातील यूजर्सना हा कार्यक्रम रात्री १०.३० वाजल्यापासून पाहता येणार आहे. Apple या इव्हेंटचे लाइव्ह स्ट्रीमिंग आपल्या अधिकृत वेबसाइटसह YouTube आणि Apple TVवर करणार आहे.

**कोणते गॅजेट्स लॉन्च होण्याची शक्यता?**

या इव्हेंटमध्ये सर्वाधिक लक्ष iPhone १८ Pro आणि iPhone १८ Pro Maxकडे असणार आहे. रिपोर्ट्सनुसार या दोन्ही मॉडेल्समध्ये नवीन २nm A२० Pro चिप दिली जाऊ शकते. डिझाइनमध्येही काही महत्त्वाचे बदल अपेक्षित आहेत. यामध्ये लहान Dynamic Island, नवीन कलर ऑप्शन्स आणि कॅमेरा अपग्रेड्स पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

iPhone १८ Pro Maxमध्ये ४८MP मुख्य कॅमेरा आणि व्हेरिएबल अपर्चर दिले जाण्याची चर्चा आहे. याशिवाय Under-Display Face ID आणि नवीन C२ मॉडेम मिळण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

**पहिला फोल्डेबल iPhone येणार?**

Appleच्या पहिल्या फोल्डेबल iPhoneबाबतही गेल्या काही काळापासून मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. या डिव्हाइसला iPhone Fold किंवा iPhone Ultra असे नाव दिले जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. रिपोर्ट्सनुसार, फोल्डेबल iPhoneमध्ये आतल्या बाजूला सुमारे ७.८ इंचांचा, तर बाहेरील बाजूला जवळपास ५.३ इंचांचा डिस्प्ले मिळू शकतो, मात्र फोल्डेबल iPhoneबाबत Appleकडून अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

# चित्रपट अभिनेत्री जयश्री गडकर

मराठी चित्रपटसृष्टीतील नृत्यांगना जयश्री गडकर यांच्या जीवनावर आणि प्रवासावर आधारित आहे. जयश्री गडकर एक प्रसिद्ध मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री जयश्री गडकर. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया लेखातून त्यांच्याविषयी...



**निमित्त**


या १९५० ते १९८०च्या दशकापर्यंत ती मराठी चित्रपटाची आयकॉन होत्या. भारतातील कर्नाटक राज्यातील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील कारवारपासून जवळ असलेल्या कनसगिरी येथील एका कोकणी भाषिक कुटुंबात जयश्रीचा जन्म २१ मार्च १९४२ रोजी झाला.

रामानंद सागर यांच्या मागील रामायण या दूरदर्शन मालिकेत जयश्रीने कौशलची भूमिका साकारली होती. त्यात राजा दशरथच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेला अभिनेता बाळ धुरी आणि जयश्री यांचा विवाह झाला होता. गडकर यांनी तरुण असतानाच नृत्यांगना म्हणून व्यवसायाला सुरुवात केली. चित्रपटांमध्ये तमाशा नृत्यांगना व्हा. त्यांचा पहिला भाग १९५५मध्ये आलेल्या व्ही. शांतारामचे वडील पायल हे बाजे येथील नृत्य गटाचे सदस्य होते, ज्यामध्ये जयश्रीने प्रमुख भूमिका साकारली होती. १९५६मध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी दिसतं तसं नसतं या चित्रपटाद्वारे अभिनयक्षेत्रात पदार्पण झाले. नंतर दिनकर पाटील दिग्दर्शित सीतां तसम नसथन या मराठी चित्रपटात ती राजा गोसावी यांच्यासोबत एका छोट्या नृत्याच्या भूमिकेत दिसली. त्यानंतर आलेला पहिला चित्रपट ज्यात त्याने मुख्य भूमिका केली होती, बनथ्ये आयका, जो तमशावर आधारित होता. त्या चित्रपटामुळे तिला ओळख मिळाली आणि ती मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वांत समृद्ध आणि यशस्वी नायिका बनली. आपल्या कारकिर्दीत जयश्रीने २५०हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. त्यात तमाशा, प्रेम आणि गरीब-श्रीमंत कथांचे वैशिष्ट्य होते.

जयश्री गडकर यांचे पती बाळ धुरी आणि चिरंजीव अविनाश आणि विश्वजीत धुरी यांनी जयश्री गडकरांच्या जीवनप्रवासावर वरील नावाचा एक कार्यक्रम बनवला आहे. त्यात मधुरा दातार आणि प्रशांत नासेरी काम करीत असून तुषार दळवी आणि दीप्ती भागवत यांचे सूत्रसंचालन आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ १७ जानेवारी २०१७ रोजी झाला.

जयश्रीबाईंना अनेक मानसन्मानांनी गौरवण्यात आले. मानिनी, वैजयंता, सवाल माझा ऐका, साधी माणसं, पवनाकाठचा धोंडी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्री या राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. साधी माणसं, पाटलाची सून, थांब लक्ष्मी कुंकू लावते आणि घरगंगेच्या काठी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचे राज्य पुरस्कार प्राप्त झाले. घरकुलसाठी विशेष अभिनेत्री राज्य पुरस्कार त्यांना देण्यात आला. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकीर्दीकरता त्यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, ग.दि. माडगूळकर आणि जनकवी पी.सावळाराम पुरस्कार यांनी गौरवण्यात आले. त्यांचे अशी मी जयश्री हे आत्मचरित्र १९८६ साली प्रसिद्ध झाले. यामध्ये त्यांनी आपल्या चित्रपटातील कारकीर्दीचा वेध घेतला आहे. त्यांचे २९ ऑगस्ट २००८ रोजी मुंबईत हृदयविकाराने निधन झाले. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### सकाळची डोकेदुखी दूर होण्यासाठी या गोष्टी करा...

सकाळी उठल्यावर डोके दुखणे ही अनेकांना सतावणारी सामान्य समस्या आहे. ती केवळ थकव्यामुळेच होते असे नाही तर त्यामागे अनेक कारणे असतात. रात्री नीट झोप न लागणे, वारंवार जाग येणे किंवा झोपेत श्वास रोखला जाणे म्हणजेच स्लीप पनिया ही डोकेदुखीची मोठी कारणे ठरतात. मात्र फक्त काही गंभीर कारणे असतील असे नाही. काही वेळा सामान्य कारणेही असतात.



काही जणांना उशीची उंची चुकीची असल्यामुळे मानेला ताण येतो आणि त्याचा परिणाम डोक्यावर होतो. डोकं जड होतं आणि दुखतं.

रात्री झोपण्यापूर्वी जास्त प्रमाणात मद्यपान किंवा कॅफीन घेतल्यानेही सकाळी डोकेदुखी जाणवते. शरीरातील पाण्याची कमतरता म्हणजे डिहायड्रेशन होते. त्यामुळे डोकं दुखत. पाणी भरपूर पिणे गरजेचे आहे.

रात्री उशिरापर्यंत मोबाइल किंवा कॉम्प्युटरचा वापर करून डोळ्यांवर ताण देणे ही कारणे देखील सकाळच्या डोकेदुखीशी संबंधित आहेत.

दात खाण्याची सवय अनेकांना असते. झोपेत जबड्यावर जोर देऊन दात चावणे त्याचा आवाज करणे यामुळे डोकं दुखतं. ही कृती पोटात जंत असल्यामुळे होते. त्यामुळे जंतांचे औषध उपयुक्त ठरते.

काही पोषक घटकांची कमतरता शरीरात असेल तर असं डोकं दुखतं. जसे की जीवनसत्त्व 'बी', 'सी', 'बी १२' यांची कमतरता असेल किंवा लोहाची कमतरता असेल. त्यामुळे सकाळी उठल्यावर डोकं दुखतं किंवा चक्कर येते.

यावर सोपे उपाय करायचे झाले तर सर्वात आधी पुरेशी व शांत झोप घेणे आवश्यक आहे. रात्री झोपण्यापूर्वी कॅफिन किंवा मद्य टाळावे आणि झोपण्याची वेळ ठरवा योग्य वेळीच झोपा. उशी मऊसर आणि मानेला योग्य आधार देणारी असावी. झोपण्याआधी एक ग्लास कोमट पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहते आणि सकाळी डोकेदुखी टाळता येते. खोलीत पुरेशी हवा खेळती ठेवणे आणि झोपण्याआधी स्क्रीनचा वापर कमी करणेदेखील उपयोगी ठरते. मात्र जर रोज सकाळी हा त्रास होतो, तर ते गंभीर समस्येचे लक्षण असू शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# कोरोनामुळे बंद झालेली एसटी पुन्हा धावली!

## विद्यार्थिनींनी चालक-वाहकांना बांधल्या राख्या



**नेरळ : प्रतिनिधी**

कोरोना काळात बंद झालेली नेरळ-देवपाडा एसटी बससेवा पुन्हा सुरू झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवसंजीवनी मिळाली आहे. या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धामोते येथील नेरळ विद्या भवन माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेरळ बस डेपोमध्ये चालक व वाहकांना रक्षाबंधनाच्या निमित्ताने राख्या बांधून अनोखा उपक्रम राबविला. नेरळ-देवपाडा मार्गावरील बस अनेक वर्षे बंद असल्याने दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत होता. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून दूर जात होते आणि शाळेची पटसंख्याही घटत होती, मात्र गेल्या दोन वर्षांपासून एसटी सेवा नियमित सुरू झाल्याने विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित व सुलभ झाला असून शाळेतील प्रवेशसंख्येतही वाढ झाली आहे.

याच भावनेतून महाराष्ट्र शासन पुरस्कृत सह्याद्री इको क्लबच्या वतीने नेरळ बस डेपो येथे चालक अशोक शिंदे, चंद्रकांत मडवी तसेच वाहक सचिन तांबे व दीपा भवारे यांना विद्यार्थ्यांनी राख्या बांधून त्यांच्या सेवेला सलाम केला. कार्यक्रमाला इकोचे अध्यक्ष कुमार तन्मय आगे, सहशिक्षक सचिव संतोष कांबरी, खजिनदार मनस्वी खाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निवृत्ती खाडे तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या शिक्षिका संगीता चंदने उपस्थित होत्या.

## लोहोपमधील कंपनीतून ४२ हजारांचा माल चोरीला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील लोहोप गावाच्या हद्दीत असलेल्या सिलिंकरर्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेड येथे चोरीची घटना घडल्याने औद्योगिक परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कंपनीच्या शॉप फ्लोअर शेड क्रमांक १मधून अज्ञात आरोपीने सुमारे ४२ हजार रुपये किमतीचा माल चोरी केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी कंपनीच्या वतीने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. चोरी करणाऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपासाची दिशा निश्चित करण्यात येत असून, सहाय्यक फौजदार कोळेकर पुढील तपास करत आहेत. औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून कंपनी व्यवस्थापनाने सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज व्यक्त होत आहे.




## दहिवली शाळेत वृक्ष रक्षाबंधन साजरे

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील दहिवली येथील जनता विद्यामंदिर प्रशालेत अनोखे रक्षाबंधन साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी वृक्षाला राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले. शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर घुगे यांच्या मार्गदर्शनानुसार सांस्कृतिक प्रमुख वैशाली नेमाडे व प्रताप गिते यांच्या संकल्पनेतून वर्गावर्गात रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

तसेच निसर्गातील झाडांचे महत्त्व ओळखून व त्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी वृक्षांना विद्यार्थ्यांनी राखी बांधली व वृक्षांचे संगोपन करण्याबद्दल सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



## नारळी पौर्णिमेला श्रीवर्धनचा किनारा दुमदुमला; सागराच्या साक्षीने कोळी संस्कृतीचा जल्लोष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रावणातील पौर्णिमा म्हणजे कोकणातील मच्छीमार समाजाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा दिवस. समुद्राला देव मानून त्याची पूजा करणाऱ्या कोळी बांधवांनी यंदाही श्रीवर्धन तालुक्यात नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरी केली. कोळीगीतांचे सूर, सनई-चौघड्यांचा निनाद, ढोल-ताशांचा ठेका, फटाक्यांची आतषबाजी, रंगीबेरंगी नौका आणि पारंपरिक वेशभूषेतील मिरवणुकीमुळे संपूर्ण किनारपट्टी उत्सवी रंगात न्हाऊन निघाली.



मच्छीमारांच्या जीवनात समुद्राला अन्नदाता, पालनकर्ता आणि देवाचे स्थान आहे. त्यामुळे नारळी पौर्णिमा हा केवळ धार्मिक सण नसून सागराप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि नव्या मासेमारी हंगामाचे स्वागत करण्याचा दिवस मानला जातो. १ जूनपासून सुरू असलेल्या मासेमारी बंदीच्या काळात मच्छीमार समुद्रापासून दूर राहतात. मत्स्यप्रजननाच्या काळात समुद्राला विश्रांती मिळावी आणि मत्स्यसंपदा टिकून राहावी या उद्देशाने पावसाळ्यात मासेमारी बंद ठेवली जाते.जीवना, दिघी, कुडगाव, आदगाव, दिवेआगर, भरडखोल, शेखाडी, मुळगाव आणि बागमांडला यांसह तालुक्यातील विविध मच्छीमार गावांमध्ये तयारी काही दिवस आधीपासूनच सुरू झाली होती.

अनेक कुटुंबांनी सागराचे पवित्र पाणी तांब्याच्या कळशीत आणून देव्हाऱ्यात ठेवले आणि नारळी पौर्णिमेपर्यंत त्याची दररोज पूजा केली. जीवना कोळीवाड्यात यंदाची नारळी पौर्णिमा विशेष उत्साहात साजरी झाली. वरचा जीवना आणि खालचा जीवना कोळीवाडा पारंपरिक सजावटीने उजळून निघाला होता. चुनेकर पार्टी, श्रीम पार्टी आणि पोशा पार्टी या तीनही गटांनी उत्सवात सहभाग घेतला. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. महिलांनी डोक्यावर सागराच्या पाण्याने भरलेल्या कळशी घेऊन मिरवणूक काढली. "नाखवा होरीन घेर मार, सागर राजाची पूजा कर" आणि "सागर राजा दयाळा, जाळं आमुचं भरू दे" अशा पारंपरिक कोळीगीतांच्या ठेक्यावर नाचत, फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणूक जीवना जेटीकडे रवाना झाली.

जेटीवर फुले, अक्षता, नैवेद्य अर्पण करून सागरराजाची विधिवत पूजा करण्यात आली आणि मानाचा नारळ वाहण्यात आला. मच्छीमारांनी "सागर राजा, मासा भरभर दे, आमच्या नौका सुखरूप परत आण" अशी प्रार्थना केली. यानिमित्ताने नौकांची स्वच्छता करून रंगरंगोटी करण्यात आली होती. नवीन जाळी, दोरखंड आणि पाल सज्ज करण्यात आले होते. शासनाने मासेमारीसाठी १५ ऑगस्ट रोजी अधिकृत सुट्टी जाहीर केली असली तरी अनेक मच्छीमार नारळी पौर्णिमेलाच सागराला नारळ अर्पण करून नव्या हंगामाची सुरुवात करण्याच्या परंपरेला प्राधान्य देतात. हा सण श्रद्धेबरोबरच सागर संवर्धनाचाही संदेश देतो.

## तिवरे शाळेतील चिमुकल्यांनी घेतली सहाय्यक आयुक्तांची मुलाखत

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा तिवरे येथे वार्षिक व शैक्षणिक तपासणीनिमित्त कोकण भवनच्या सहाय्यक आयुक्त (तपासणी) मनीषा देवगुणे यांनी भेट दिली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहात आणि आत्मविश्वासाने त्यांची थेट मुलाखत घेतली.

शाळेत आगमन होताच विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर संगीतमय कवायतीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. त्यानंतर शालेय उपक्रमांची चित्रफीत दाखवण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी परवानगी घेऊन सहाय्यक आयुक्तांशी संवाद साधला.मुलाखतीदरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मनीषा देवगुणे यांनी सोप्या व मार्गदर्शक भाषेत उत्तरे दिली.



'तुमचा आतापर्यंतचा प्रवास कसा राहिला', या प्रश्नावर त्या म्हणाल्या, ''माझा प्रवास तुमच्यासारखाच राहिला. माझे वडील पीडब्ल्यूडीमध्ये होते आणि आई शिक्षिका होती. वडिलांच्या बदलीमुळे मला वेगवेगळ्या जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळाली. जिल्हा परिषद शाळेनेच पाया मजबूत केला. पुढे होमिओपॅथीचे शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झाले, त्यानंतर पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीतून एमपीएससीचा अभ्यास केला. गेल्या २४ वर्षांपासून कोकण विभागात विविध पदांवर प्रशासकीय सेवा देत आहे.''

'तुमच्यासारखे अधिकारी बनण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे', या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, ''सर्वांत पहिले शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले ठेवणे गरजेचे आहे. जसे तुम्ही संगीतमय कवायतीत उत्कृष्ट समन्वय, लय आणि शारीरिक मेहनत दाखवली, तसाच ताळमेळ अभ्यासात ठेवावा लागतो. सतत मेहनत आणि एकाग्रता ठेवली तर नक्कीच अधिकारी बनू शकता.'' या संवादाने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. शालेय दस्तऐवज, परसबाग आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून तपासणी पथकाने समाधान व्यक्त केले. गेल्या ३ वर्षांतील शाळेची प्रगती, शिक्षक, ग्रामस्थ, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, विस्तार अधिकारी नवनाथ साबळे व केंद्रप्रमुख अनिल राणे यांच्या सहकार्याबद्दल मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी गटविकास अधिकारी लता मोहिते, तपासणी पथक प्रमुख प्रफुल्ल पाटील, समन्वयक रविकिरण पाडवी, सहाय्यक प्रशासन अधिकारी राजन थळे, शाखा अभियंता गुलाबराव देशमुख व कृषी अधिकारी अशोक महामुनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत आणि सूत्रसंचालन रवींद्र आंधळे यांनी केले.

## माथेरानमधील रस्त्यांची दुरवस्था; उपाययोजनेची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी यंदा पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. त्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

चिखलमय रस्त्यावरून चालताना त्रासदायक ठरत असून घसरून पडण्याचे प्रमाण वाढते आहे. त्यातच घोड्यावर स्वार होऊन पॉईंट्सचा आनंद घेण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांना खड्डेमय रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाच प्रकारे दस्तुरीवरून येताना क्ले-पेव्हर ब्लॉकचे रस्तेसुध्दा खराब झाले असून ई-रिक्षा चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

प्रशासनाने तातडीने रस्त्यांची पाहणी करून दुरूस्ती करावी आणि घोडेवाले, पर्यटक तसेच स्थानिकांचा जीवघेणा प्रवास थांबवावा, अशी मागणी होत आहे.



## ईद-ए मिलादनिमित्त उद्या माणगावमध्ये रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस ईद-ए मिलाद म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने सामाजिक बांधिलकीतून माणगाव तालुका उम्मत-ए मुस्लिमा कमिटीतर्फे रविवारी (दि. ३०) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर सर्वांसाठी, रक्तदान हे जीवनदान व सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो, ही समाजसेवी भावना नजरेसमोर ठेवून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस) जुने माणगाव येथे हे शिबिर होणार आहे. या जनसेवेच्या उदात्त उपक्रमात सहभागी होऊन जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

धर्म, भाषेची नाही अडचण, हा आहे केवळ भावनेचा प्रश्न, एकत्र येऊन साजरी करू ईद-ए मिलादचा जश्न, असा संदेश सर्व जाती-धर्मातील लोकांना आयोजकांतर्फे देण्यात आला आहे.

रक्त हे कृत्रिमरीत्या तयार होत नाही, तर नैसर्गिकरीत्या तयार होत असते. मानवाला प्रसंगी मानवाच्याच रक्ताची गरज भासते. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याचे एकावेळी फक्त ३५० मिली एवढे रक्त घेतले जाते. रक्तदान हेच खरे सर्वश्रेष्ठ दान असून आपण केलेले रक्तदान २४ ते ४८ तासांत भरून निघत असते. दर तीन महिन्यांनी रक्तदात्याला रक्तदान करता येते. रक्त हे असे आहे की यामध्ये जात-पात पाहिली जात नाही. रक्ताचा रंग सर्व मानव जातीचा लालच असून मानवी रक्तच मानवाच्या उपयोगी पडत असते.

आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. ज्याने एका जीवाचे रक्षण केले, त्याने संपूर्ण मानव जातीचे रक्षण केले. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला शांततेचा संदेश दिला.

त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी एकत्र येत समाजाचे काहीतरी देणे लागतो, हा उद्देश नजरेसमोर ठेवून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सर्वधर्मसमभाव मानून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

## नवीन पोसरीतून अल्पवयीन तरुणी बेपत्ता; तक्रार दाखल

**मोहोपाडा** : नवीन पोसरी येथून १७ वर्षे आठ महिन्यांची अल्पवयीन तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून नेल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नवीन पोसरी-मोहोपाडा येथे वास्तव्यास असलेल्या राजाभाऊ एकनाथ लिंबोळे यांनी याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार त्यांची मुलगी वैष्णवी राजाभाऊ लिंबोळे (१७ वर्षे आठ महिने) ही घरातून बेपत्ता झाली असून अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली मपोसई अनुसया ढोणे पुढील तपास करत आहेत.

पोलिसांकडून बेपत्ता तरुणीचा शोध घेण्यासाठी आवश्यक तपास सुरू असून नागरिकांकडे तिच्याबाबत कोणतीही विश्वसनीय माहिती असल्यास ती तातडीने पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालकांच्या नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नोंद असून खालील नमूद जमीन त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. यातील मालक/खातेदार १) श्री. मनोहर गोपाळ मोरे, २) श्री. अनिल गोपाळ मोरे, ३) श्रीमती सविता उर्फ करूणा काशिनाथ गंभे, ४) श्रीमती कविता उर्फ दिपीका दत्ताराम बांदल, ५) श्रीमती वासंती वसंत पवार, ६) श्रीमती संगीता हरिभाऊ मोरे, असून त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**जिल्हा-रायगड, व तालुकाः रोहा, तलाठी सजा चणेरा यांचे हद्दींतील (शेताचे स्थानिक नाव-तळ्याची पाखर) मौजे बिरवाडी, येथील मिळकत - शेतजमिन**

| गट/भुमापन क्र. | क्षेत्र हे.आर | आकार. रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|
| २६१ | वरकस २-०२-४०<br>पो. खराबा ०-४७-६०<br>एकूण २-५०-०० | १.३९ | निसप्र / भात |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशील १) सौ. वनिता विजय भोपी, २) सौ. दिपा विनायक खरे, ३) श्री. दिगंबर दिलीप पाटील, ४) श्री. प्रशांत भरत म्हात्रे, ५) श्री. नारायण नागा भगत यांनी नमूद जमीन मालक यांचेशी काही बयाणा रक्कम देवून खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन यथायोग्य प्राधिकरणाकडे आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

सही/-
**अॅड. मुरलीधर रामदास पाटील**

कार्यालय :- शॉप क्र. १, प्लॉट क्र. ८५/६, श्रीगणेश अपार्टमेंट, एन.एल.१, सेक्टर-१०, नेरूळ (पश्चिम), नवी मुंबई ४००७०६, मो.क्र. ९३२४२४४३२४



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भावे, ता. महाड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशील श्री. जनार्दन कुंडलिक पाटील यांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा. वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तकार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतींने वर्णन**

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| १६५४ | २-४७-४०<br>पैकी क्षेत्र<br>१-२७-४० | ०.५६ | श्री. महेंद्रकुमार रामदयाल बाहेती |

**महाड**
**ता. २९/०८/२०२६**

सही/-
**अॅड. संदिप कालगुडे**
**महाड-रायगड**

# नेरूळ स्टेशनबाहेर नशेखोरांचा वावर

## कडक कारवाई करण्याची मागणी




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ रेल्वेस्थानकाच्या पश्चिमेकडील परिसरात रात्रीच्या वेळी नशेखोर आणि बेघरांचा वाढता वावर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. नेरूळ रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील परिसरात रात्रीच्या वेळी नशेखोर आणि बेघरांचा वाढता वावर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. मंगळवारी मध्यरात्री किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

प्लास्टिकचे कॅरेट, दगड आणि हाताने मारहाण करण्यात आल्याने दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर दोघांना किरकोळ दुखापत झाली. या घटनेनंतर स्थानकाबाहेरील परिसरातील सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नेरूळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेक्टर २० मधील स्थानकाच्या पश्चिम बाजूस मंगळवारी रात्री सव्वा एकच्या सुमारास ही घटना घडली. चालताना धक्का लागल्याच्या कारणावरून काही जणांमध्ये वाद झाला. त्यानंतर झालेल्या मारहाणीत देवनाथ ठाकूर आणि संगम चौधरी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर अशिबहुल शेख आणि राहुल शेख यांना किरकोळ दुखापत झाली.

> **स्थानकाबाहेरील बेघरांचा प्रश्न गंभीर बनला आहे. बेघरांना हटविण्यासाठी नवी मुंबई महापालिका आणि सिडको यांच्याशी संपर्क साधण्याचे काम सुरू असून लवकरच संयुक्तपणे कारवाई करण्यात येईल.**
> **–अजय कांबळे,**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरूळ**

शिवीगाळ आणि दमदाटी केल्याप्रकरणी नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून संजीव गुजूजी पवार याला अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले. हा प्रकार केवळ एका वादापुरता मर्यादित नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. स्थानकाबाहेरील काही भागांत अनेक बेघर व्यक्ती ठाण मांडून राहत असून, रात्रीच्या वेळी या परिसरात नशेखोरांचा वावर वाढतो. नशेच्या अवस्थेत होणारे वाद, हाणामारी आणि सार्वजनिक ठिकाणी मद्यपान यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. विशेषतः महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे. या परिसरात गांजा आणि अन्य अमली पदार्थांची कथित विक्री होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या मद्यविक्रीच्या दुकानांतून मद्य खरेदी करून सार्वजनिक ठिकाणीच मद्यपान केले जात असल्याचेही सांगण्यात येते. महिलांची छेडछाड करण्याचे प्रकार वाढल्याच्याही तक्रारी आहेत. वारंवार तक्रारी करूनही पोलीस किंवा रेल्वे पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. दरम्यान, या परिसरात पोलिसांतर्फे वेळोवेळी कारवाई केली जात असल्याचा दावा नेरूळ पोलिसांनी केला आहे. तसेच यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# नारळी पौर्णिमेला कोळीगीतांच्या तालावर थिरकले कोळी बांधव



**नवी मुंबई : बातमीदार**

समुद्राशी आणि खाडीशी असलेले अतूट नाते जपत नवी मुंबईतील आगरी–कोळी बांधवांनी पारंपरिक उत्साह, भक्तिभाव आणि सांस्कृतिक जल्लोषात नारळी पौर्णिमा साजरी केली. 'सण आयला गो, नारळी पुनवेचा'च्या सुरांनी कोळीवाडे दुमदुमले, ढोल–ताशांच्या गजरात मिरवणुका निघाल्या आणि दर्याराजाला नारळ अर्पण करून सुख–समृद्धीची प्रार्थना करण्यात आली.

दिवाळे कोळीवाडा, बेलापूर, करावे, नेरूळ, सारसोळे, वाशी, घणसोली, ऐरोली आणि दिवा कोळीवाड्यात उत्सवाचे चैतन्य पाहायला मिळाले. कोळी बांधवांनी होड्यांना रंगरंगोटी करून सजविले होते. पारंपरिक वेशभूषेतील महिला, पुरुष व बालकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. कोळीगीतांच्या तालावर थिरकत व पारंपरिक वाद्यांच्या ठेक्यावर नाचत कोळी समाजाने लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले. खाडीकिनारी वसलेल्या गावांत मासेमारी हा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला पारंपरिक व्यवसाय आहे.

शेतीक्षेत्र कमी झाले असले तरी खाडीशी जोडलेली मासेमारीची परंपरा कायम आहे. शहरातून सुमारे ८०० ते ९०० होड्या मासेमारीसाठी पाण्यात उतरतात, मात्र वाढते प्रदूषण व रासायनिक सांडपाण्यामुळे खाडीतील मासळीचे प्रमाण घटत असल्याची चिंता कोळी बांधव व्यक्त करतात. तरीही संकटांवर मात करत दर्याराजाच्या चरणी श्रद्धा ठेवून ते नव्या मासेमारी हंगामाचे स्वागत करतात.

दिवाळे कोळीवाड्यात सिद्धी मित्र परिवारासह स्थानिक कोळी बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत ब्रास बँडच्या तालावर मिरवणूक काढली. समुद्रकिनारी आरती करून होड्यांची विधिवत पूजा करण्यात आली. दर्याला नारळ अर्पण करून 'यंदा जाळ्याला भरपूर म्हावरा मिळू दे', अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.



# नारळी पौर्णिमेनिमित्त नवी मुंबईत आनंदाला उधाण

**नवी मुंबई : बातमीदार**

मूलतः कोळी आणि आगरी समाजबांधवांची वस्ती असलेल्या नवी मुंबईमध्ये नारळी पौर्णिमेनिमित्त शहराच्या विविध भागात आनंदाला उधाण आले होते. दर्याराजाची विधिवत पूजा करून त्याची कृपादृष्टी सर्वांवर राहावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. वाजतगाजत, नाचत पालखी मिरवणुका निघाल्या. सारसोळे आणि दिवाळे कोळीवाडा येथे पारंपरिक पद्धतीने नारळी पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दोन्ही ठिकाणी माजी आमदार संदीप नाईक यांनी उत्सवात सहभाग घेतला. दिवाळे कोळीवाड्यात ग्रामस्थांच्या वतीने आयोजित 'नारळ सोन्याचा, दिवाळे गावचा' उत्सवात पारंपरिक पद्धतीने नारळी पौर्णिमा साजरी करण्यात आली. समुद्रदेवतेची पूजा करून समुद्र व पर्यावरणाच्या संरक्षणाचा संकल्प करण्यात आला.

सारसोळे ग्रामस्थांच्या वतीने आयोजित नारळी पौर्णिमा उत्सवानिमित्त भव्य पारंपरिक पालखी मिरवणूक काढण्यात आली. ढोलताशांचा गजर, पारंपरिक कोळी गीतांचा ठेका व मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या कोळी बांधवांच्या उत्साहाने परिसर दुमदुमून गेला. नारळी पौर्णिमेनिमित्त आगरी–कोळी बांधवांना सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य लाभावे तसेच कष्टकरी मच्छीमार बांधवांचे दर्याराजाकडून सदैव रक्षण व्हावे, अशा शुभेच्छा संदीप नाईक यांनी दिल्या.

महापौर सुजाता पाटील, नगरसेवक सुरज पाटील, नगरसेविका रूपाली भगत यांच्यासह मोठ्या संख्येने कोळी बांधव आणि स्थानिक नागरिक पालखी मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते.

# वाशीच्या ईटीसी केंद्रात विद्यार्थिनींकडून रक्षाबंधन उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ. जी. नाईक महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाराष्ट्राचा पारंपरिक सण राखी पौर्णिमेचे औचित्य साधून प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांसाठी राखी बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी पाने, फुले, मसाल्याचे पदार्थ, पेपर क्विलिंग, क्रोशे, विणकाम, टिकल्या आदी वस्तूंचा वापर करीत सुंदर, सुबक आणि पर्यावरणस्नेही राख्या बनविल्या. सदर स्पर्धेचा सामाजिक उद्देश लक्षात घेऊन जवळपास १०० विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने मोठ्या उत्साहाने भाग घेत आपली कलाकुसर, कल्पकता आणि सर्जनशीलता वापरून आकर्षक राख्या बनविल्या. या स्पर्धेचे परीक्षण समाजसेविका वंदना कुचिक आणि समाजसेवक अरुण कुचिक यांनी केले. महाविद्यालयातील या अनोख्या उपक्रमाचे व सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना यशस्वी वाटचालीसाठी परीक्षकांनी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत वाणिज्य शाखा तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्राची डिकेने बनविलेल्या लसूण व कांद्याच्या पातीच्या राखीने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील आर्या कांबळे हिने व तृतीय क्रमांक प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील स्नेहल घुळेने पटकाविला. उत्तेजनार्थ दोन पारितोषिके प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील गौरी वाडकर व द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेतील सायली सणस यांना देण्यात आली.

उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र, वाशी येथील अपसामान्य मुलांना बांधून अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन सोहळा साजरा केला. त्या दिव्यांग मुलांनीही एनएसएसच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन रक्षाबंधन साजरे केले. यावेळी एफ. जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, समन्वयक दत्तात्रय घोडके, सांस्कृतिक विभागाच्या अध्यक्षा जयश्री दहाट, समिधा पाटील, सीमा शिंदे, चिन्मयी वैद्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रमोद साळुंखे, सायकॉलॉजी विभागाच्या नेहा भोरे तसेच उपक्रमातील सहभागी विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

# दिवाळे शाळेत नारळी पौर्णिमेचा सांस्कृतिक सोहळा




**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाडा येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २ व ११७ मध्ये विद्यार्थ्यांनी पारंपरिक उत्साहात नारळी पौर्णिमा साजरी केली. शिक्षणासोबतच आपल्या समृद्ध संस्कृती, परंपरा आणि सण–उत्सवांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने शाळेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक कोळी वेशभूषा परिधान करून कोळी नृत्य सादर करत जल्लोषपूर्ण वातावरण निर्माण केले. कोळी समाजाच्या जीवनाशी आणि समुद्राशी अतूट नाते सांगणाऱ्या नारळी पौर्णिमेचे सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांना यावेळी समजावून सांगण्यात आले. पारंपरिक पद्धतीने समुद्राला नारळ अर्पण करून समुद्रदेवतेचे पूजन करण्यात आले. नारळी पौर्णिमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'आपली संस्कृती, आपली ओळख' याची जाणीव करून देत आधुनिक शिक्षणासोबतच संस्कार आणि परंपरांची सांगड घालण्याचा प्रयत्न शाळेने केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे नारळी पौर्णिमेचा सोहळा आनंदमय आणि संस्मरणीय ठरला.

# नारळी पौर्णिमा उत्सवात आमदार मंदा म्हात्रे यांची हजेरी



**नवी मुंबई : बातमीदार**

आगरी–कोळी संस्कृतीचा गौरव आणि भूमिपुत्रांच्या श्रद्धेचा महान उत्सव असलेल्या नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील विविध कोळीवाड्यांना भेट दिली. यावेळी स्थानिक भूमिपुत्र आणि आगरी–कोळी बांधवांच्या सुखात सहभागी होत त्यांनी सणाचा आनंद द्विगुणित केला. "दर्या सागर हाच आमचा खरा राजा" अशा अथांग श्रद्धेने दिवाळे गाव आणि सारसोळे जेट्टी येथे ग्रामस्थांच्या वतीने आयोजित पूजनाच्या कार्यक्रमाला आमदार मंदा म्हात्रे यांनी विशेष उपस्थिती लावली.

अत्यंत उत्साहात, ढोल–ताशांच्या गजरात निघालेल्या सोहळ्यात त्या सहभागी झाल्या. त्यांनी दर्याराजाचे दर्शन घेऊन सर्व नवी मुंबईकरांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी उपस्थित कोळी बांधवांशी संवाद साधताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या, "आगरी–कोळी संस्कृती ही आपल्या नवी मुंबईची खरी ओळख आणि गौरव आहे. भूमिपुत्रांचे प्रश्न, कोळीवाड्यांचा विकास आणि मच्छीमार बांधवांचे हक्क यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. सण–उत्सव असो वा अडचणीचा काळ, मी नेहमीच माझ्या या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीन."

दिवाळे आणि सारसोळे गावातील या दोन्ही मिरवणूक सोहळ्यांना व कार्यक्रमांना स्थानिक ग्रामस्थ, कोळी बांधव–भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने पारंपरिक पोशाखात उपस्थित होते. आमदार मंदा म्हात्रे यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण होते.

# गोशाळेत अडकलेल्या अजगराची सुटका



**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी बेलापूर येथील गोशाळेच्या तब्बल २५ ते ३० फूट उंचीवरील पत्र्यामध्ये सहा ते सात फूट लांबीचा अजगर अडकून पडल्याची घटना घडली. गोशाळेतील कर्मचाऱ्यांनी तत्काळ पुनर्वसु फाउंडेशनशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पुनर्वसु फाउंडेशनचे सर्पमित्र अष्टविनायक मोरे त्वरित घटनास्थळी दाखल झाले.

पाहणी केली असता अजगर हा पत्रा आणि लोखंडी रॉडच्या मध्ये अडकलेला असल्याचे निदर्शनास आले. अजगर बिनविषारी असून त्याची लांबी अंदाजे सहा ते सात फूट होती. सापाची स्थिती पाहता रेस्क्यूसाठी मोठे आव्हान असल्याने अष्टविनायक मोरे यांनी तात्काळ अग्निशमन दलाशी संपर्क साधला. काही वेळातच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. रेस्क्यूदरम्यान अष्टविनायक मोरे यांनी शिडीच्या मदतीने मोठ्या धाडसाने वर चढून अजगराला पकडले, मात्र अजगर पत्रा आणि रॉडमध्ये घट्ट अडकलेला असल्याने त्याला थेट बाहेर काढणे शक्य होत नव्हते. त्यामुळे अग्निशमन दलाच्या मदतीने पत्रा वाकवून आणि आवश्यक तो भाग बाजूला करून अजगराला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

दीड ते दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अजगराची सुखरूप सुटका करण्यात यश आले. रेस्क्यूनंतर नागरिक व गोशाळेतील कर्मचाऱ्यांना अजगराबद्दल माहिती देऊन पर्यावरणातील महत्त्व समजावून सांगण्यात आले.


।। ज्ञानासाठी सदैव जागू ।।



**महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना**

नोंदणी क्र. : का उ आ ठाणे/२१८९/२०२४ दि.३/१०/२०२४

राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्या अंतर्गत

**कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा-२०२६ (उत्तर-रायगड जिल्हा)**

**आमंत्रण पत्रिका**

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, **"महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने"** शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर बंधू-भगिनींसाठी **"राज्यस्तरीय पुरस्कार"** सोहळ्या अंतर्गत **"कोकण विभाग गुणवंत पुरस्कार २०२६"** शनिवार, दिनांक : **२९/०८/२०२६** रोजी दुपारी २ वा. **सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय,** कळंबोली, सेक्टर १, मॅक्डोनाल्डच्या जवळ, जिल्हा-रायगड या ठिकाणी खालील मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर पुरस्कार सोहळ्यात सर्व संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.



आयोजक
**आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे**
(संस्थापक अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना)

**प्रमुख अतिथी**

**आमदार श्री. प्रशांत ठाकूर** (पनवेल विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य)
**आमदार श्री. महेश बालदी** (उरण विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य)
**श्री. नितीन पाटील** (महापौर, पनवेल म.न.पा)
**श्री. अविनाश कोळी** (जिल्हा अध्यक्ष, भाजप, उत्तर रायगड)
**श्री. मंगेश वाकडीकर** (जि. प. अध्यक्ष, रायगड जिल्हा)
**श्री. रामदास शेवाळे** (जिल्हा प्रमुख / नगरसेवक पनवेल म.न.पा)
**श्री. बबन मुकादम** (स्थायी सभापती, पनवेल म.न.पा)
**सौ. प्रमिला पाटील** (उपमहापौर, पनवेल म.न.पा)
**श्री. वैकुंठ पाटील** (सभापती, कृषी व पशुपालन, राजिप)
**श्री. रविंद्र भगत** (नगरसेवक पनवेल म.न.पा)
**श्री. अमर पाटील** (नगरसेवक, पनवेल म.न.पा)
**श्रीम. गीताताई पालरेचा** (अध्यक्ष, सुधागड एज्युकेशन सोसायटी)

**आपले स्नेही**

**श्री. अरुण भोईर** (सचिव)
**श्री. राजेश पाटील** (उपाध्यक्ष)
**श्री. सागर रंधवे** (भाजपा शिक्षक सेल)
**श्री. निलेश मानकावळे**
**श्री.व्हि.व्हि. पाटील**
**श्री. संजय भगत** (संपर्क प्रमुख)
**श्री. प्रशांत भामरे** (कोकण विभाग अध्यक्ष)
**श्री. हिरामण कोकाटे** (भाजपा शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष)
**श्री. चेतन गायकवाड**
**श्री.डी.के.म्हात्रे**
**श्री. ज्ञानेश्वर मगर** (तज्ज्ञ मार्गदर्शक)
**श्री. विजय राणे** (उपाध्यक्ष)
**श्री. राजेंद्र पालवे** (संचालक-सुधागड एज्यु. सो)
**श्री. रविंद्रनाथ पाटील**
**श्री. अभिजित मटकर**
**श्री. रविंद्र वर्तक**
**श्री. विश्वनाथ म्हात्रे**
**श्रीम. ज्योती ठाकूर**
**श्री. नरेश पाटील**
**श्री. रामचंद्र ऐनकर**
**श्री. प्रदिप सुर्वे**

**रायगड जिल्हा कार्यकारणी, तालुका / अध्यक्ष, कार्यकारणी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना व मुख्याध्यापक संघ**

# महाड भाजपमध्ये वाढता कल!

## रायगड गाईड संघटनेच्या अध्यक्षांचा सहकाऱ्यांसह प्रवेश



**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे जोमाने विस्तारीकरण होत असून तरुणांमध्ये भाजपकडे येण्याचा कल वाढताना दिसून येत आहे. रायगडवाडी ग्रामपंचायत हद्दीतील हिरकणीवाडी येथील किल्ले रायगड गाईड असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण अवकीरकर व त्यांच्या सहकाऱ्यांसह तरुणांनी 'कमळ' हाती घेतले आहे. राज्य परिषद सदस्य बिपीन महामुणकर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आमदार प्रवीण दरेकर यांचे नेतृत्व, विकासकामांवर प्रभावित होऊन महाड तालुक्यातील अनेक तरुण भारतीय जनता पक्षात सक्रिय होत आहेत. नुकतेच रायगडच्या पायथ्याला असलेल्या हिरकणीवाडी येथील गाईड असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण अवकीरकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. काही महिन्यांपूर्वी आमदार दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागातील अनेक तरुणांनी भाजपत प्रवेश केला होता.

भाजपकडून केली जाणारी विकास कामे व सोडवले जाणारे जनतेचे प्रश्न यांना साथ देत आज अनेक ग्रामस्थ भाजपध्ये प्रवेश करीत आहेत. या पक्षप्रवेशासाठी पक्षाचे राज्य परिषद सदस्य बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष निलेश देवगिरीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा झाला. यावेळी बोलताना बीपीन महामुणकर यांनी सांगितले की, किल्ले रायगडवर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जागृत करणारे व पर्यटकांना सेवा देणाऱ्या सर्व गाईडस्‌ना आमदार प्रवीण दरेकर यांच्या माध्यमातून रेनकोट व इतर साहित्य पुरवले होते. त्याचबरोबर या विभागातील अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. भविष्यातदेखील भाजपच्या माध्यमातून अनेक विकासकामे केली जाणार आहेत.

किल्ले रायगड प्राधिकरण असो अथवा महाड–रायगड मार्ग, याचबरोबर गावात होणारी असंख्य विकासकामे खऱ्या अर्थाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत. त्यामुळे असंख्य तरुणांचा कल भाजपकडे वाढला असल्याचे महामुणकर म्हणाले.

या कार्यक्रमास भाजपचे महेश शिंदे, सागर हिरवे, नागेश महाडिक, उदय अवकिरकर, गणेश अवकीरकर यांच्यासह असंख्य तरुण उपस्थित होते.

## लाडिवली कातकरवाडी जि.प. शाळेचा कायापालट

**रसायनी, मोहपाडा : प्रतिनिधी**

अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि. पाताळगंगा कंपनीने जि. प. शाळा लाडिवली कातकरवाडी येथे सीएसआर निधीतून काम केले आहे. आपटा केंद्रातील शाळांच्या शैक्षणिक परिषदेत याबद्दल विशेष कौतुक झाले.

या शाळेला कंपनीने आकर्षक माहितीपूर्ण पेंटिंग, हँडवॉश स्टेशन, शौचालय दुरूस्ती, वॉटर कूलर, शाळेच्या व्यासपीठाची दुरुस्ती अशा कामांनी एक नवा चेहरा दिला आहे. रंगरंगोटी आणि सुशोभीकरणामुळे शाळेचे रूपच पालटले असून आदिवासी विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊ लागले आहेत.

केंद्रप्रमुख प्रकाश पवार यांनी या प्रसंगी शाळेच्या संपूर्ण बदललेल्या आकर्षक रूपाचे विशेष कौतुक केले आणि अल्काईल अमाईन्सच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल आभार व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक गणेश पाटील आणि कांबळे मॅडम यांनी अल्काईल अमाईन्स कंपनीच्या अधिकारी अर्चना माने आणि सीएसआर सल्लागार रवी ओंकार यांचा सत्कार केला.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राम पवार यांनी सांगितले की, शाळा आकर्षक झाल्यापासून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मोठी वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झालीय. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक विठ्ठल साबळे यांनी केले.



## प्रेस क्लबकडून दिवेआगर येथे शेतकऱ्यांचा सन्मान



**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लब संलग्न श्रीवर्धन प्रेस क्लबकडून शेतकरी सन्मान सोहळ्याचे दिवेआगर येथे आयोजन करण्यात आले होते. मागील पंधरा वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमास दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संतोष आवटी आणि श्रीवर्धन पंचायत समितीचे माजी सभापती लालाभाई जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी दिवेआगर येथील शेतकरी सुरज पाटील व बोर्लीपंचतन येथील शेतकरी किरण तळकर यांचा सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या दोन्ही शेतकऱ्यांची स्वतःची भात शेती व नारळ सुपारीच्या बागा आहेत.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांनी आपल्या मनोगतात, मीसुद्धा एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. कष्ट केल्यानंतरच त्याचे फळ चांगल्या प्रमाणात मिळते, असे म्हटले.

पंचायत समितीचे माजी सभापती लालाभाई जोशी यांनी, नारळ सुपारीच्या बागेतील पडणारी पानेदेखील त्याच ठिकाणी जमिनीत गाडल्यास त्याचे उत्तम खत तयार होते व त्याच्याबरोबर शेणखताचा वापर केल्यास नारळ सुपारीचे उत्पन्न चांगले येते, असे सांगितले.

कार्यक्रमास श्रीवर्धन प्रेस क्लबचे अध्यक्ष संजय मांजरेकर, उपाध्यक्ष सावन तवसाळकर व संतोष रेळेकर, सदस्य संतोष चौकर, भारत चोगले, दत्तात्रय पांढरकामे, सुरेश पांढरकामे, वैभव तोडणकर, आबीद करदमे उपस्थित होते.

## शिवसेना माणगाव तालुका प्रमुखपदी रमेश मोरे

**माणगाव : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार रमेश मोरे यांची शिवसेना पक्षाच्या माणगाव तालुका प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई येथील बाळासाहेब भवन पक्षाचे सचिव संजय मोरे यांच्या हस्ते रमेश मोरे यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. रायगड लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख अनिल नवगणे, दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, माणगाव शहर प्रमुखपदी येथील माजी उपसरपंच नितीन रामजी दसवते यांची, तर सचिवपदी संजय भाऊराव मोरे यांनी फेरनियुक्ती करण्यात आली आहे.



## शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार




**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ सभापती नथुराम मुकण यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीच्या डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात पार पडला.

कार्यक्रमास उपसभापती रवींद्र मांडवकर, सदस्य अक्षरा कदम, रूपाली तांडेल, गटविकास अधिकारी सुनील गायकवाड, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, साधन व्यक्ती अभिजित खांडेकर, सर्व केंद्रप्रमुख, शिक्षक, पालक बीएआरसी टीम, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

यावेळी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी इयत्ता आठवीतील तेजस्विनी भुरे, हर्षवर्धन पवार, सई वावेकर, केशव मंडलिक, रिहाब चोगले, कृपा पाटील, सातवीतील शरद राणे, हर्ष पिंपळे, संस्कृती मोडके, स्वराज सकपाळ, पाचवीतील आरूष बोडके, साईष लोखंडे, प्रार्थना ठमके, चौथीतील वाडेकर कोमल या सर्वांचा पुष्प व पदक देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या पालकांसमवेत सत्कार करण्यात आला.

यावेळी सभापती नथुराम मुकण यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आमच्या ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आदिवासीवाड्या असून त्यांना दर्जेदार शिक्षण देऊन शैक्षणिक प्रगती वाढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सूचित केले.

उपसभापती रवींद्र मांडवकर व सदस्य अक्षरा कदम यांनीही मनोगत व्यक्त केले.

## पेणमध्ये ईद उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

इस्लामचे धर्मगुरू मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस पेणमध्येही ईद–ए–मिलाद म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे खान मोहल्ला मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने लहान मुलांचे नाते पठण, प्रवचन कार्यक्रम मशिदीत आयोजित करण्यात आला होता.

ईदमुळे मुस्लिम मोहल्ल्यात आकर्षक विद्युत रोषणाई तसेच स्नेहभोजनाचे आयोजनदेखील करण्यात आले होते. मुख्य दिवशी मौलाना हैदरअली यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या जुलूसमध्ये मौलाना अन्सार हजरत, हाफीजी अताऊल रहमान, मौलाना मन्सूर, मौलाना फुरकान, मौलाना जबीर, हाफिज गुलजार आदींसह खान मोहल्ला, कसाई मोहल्ला, वडगाव, अंतोरे, वडखळ तसेच तालुक्यातून मुस्लिम बांधव, शांतता कमिटी सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कसाई मोहल्ला, आझाद मोहल्ला येथे मिरवणुकीतील लोकांना सरबत व प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांचा मुस्लिम समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला, तर उपस्थित मान्यवरांनी मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. फैय्याज इनामदार व भाऊ मुजावर यांनी तीन दिवस कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मांडले. मौलाना फुरकान यांच्या कुराणातील आयात पठणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## आंबोट येथील शाळेजवळ गतिरोधक बसवण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भालिवडी–पोटल रस्त्यावरील आंबोट येथे शाळेजवळील रस्त्यावर गतिरोधक टाकण्याची मागणी पालक आणि पोलीस मित्र संघटनेने केली आहे.

आंबोट गावामध्ये रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असून तेथून जाणाऱ्या भालिवडी–पोटल पाली रस्त्यावरून वाहने ये–जा करीत असतात. नुकताच कुंडलज येथे एका निष्पाप शालेय मुलीचा वाहनाच्या धडकेत अपघाती मृत्यू झाला आहे. ही घटना ताजी असल्याने पालकवर्गदेखील सतर्क झाला आहे.

आंबोट येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी गतिरोधक बसवणे खूप गरजेचे आहे. गावातील विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन गतिरोधक बसवावेत यासाठी मिनेश मसणे आणि रमेश सार्वजनिक बांधकाम उपविभाग कर्जत येथे निवेदन दिले. यावेळी दशरथ मुने, तानाजी ओमले हेही उपस्थित होते.





**मुरुड : नारळी पौर्णिमेनिमित्त एकदरा येथे कोळी महिलांनी सजून डोक्यावर घागरी घेत समुद्राला अर्पण केल्या आणि सागराला शांत होण्याची विनंती केली, जेणेकरून कोळी बांधवांना सुरक्षितपणे मासेमारी करता येईल.** (छाया : सुधीर नाझरे)

# प्रज्ञानंदची ऐतिहासिक कामगिरी

## ग्रँड चेस टूरचा पहिला भारतीय चॅम्पियन

**सेंट लुईस : वृत्तसंस्था**

भारतीय बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदने सेंट लुईस येथे फॅबियानो कारुआनाविरुद्ध शानदार पुनरागमन करत ग्रँड चेस टूर फायनल्सचे विजेतेपद पटकावले. हे त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचे सर्वात मोठे विजेतेपद ठरले आहे. या विजयासह प्रज्ञानंद ग्रँड चेस टूर जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला.




अंतिम सामन्याच्या सुरुवातीला प्रज्ञानंद मोठ्या अडचणीत होता. क्लासिकल सामन्यांनंतर फॅबियानो कारुआनाकडे सहा गुणांची आघाडी होती. पहिल्या क्लासिकल गेममध्ये प्रज्ञानंदला ६-० असा पराभव स्वीकारावा लागला, मात्र त्याने दुसऱ्या क्लासिकल गेममध्ये कारुआनाला ३-३ अशी बरोबरीत रोखले आणि अंतिम दिवसासाठी आशा कायम ठेवली.

अंतिम दिवशी प्रज्ञानंदने रॅपिड विभागात जबरदस्त खेळ करत कारुआनाविरुद्धचे दोन्ही सामने जिंकले. त्यामुळे सहा गुणांची पिछाडी भरून काढत त्याने सामन्यात जोरदार पुनरागमन केले. त्यानंतर ब्लिट्झमध्ये त्याने संयम राखत आपली आघाडी कायम ठेवली. ब्लिट्झमधील सुरुवातीच्या सामन्यात प्रज्ञानंदसमोर अडचणी निर्माण झाल्या होत्या, मात्र कारुआनाला आवश्यक विजय मिळवता आला नाही आणि सामना बरोबरीत संपला. त्यानंतर प्रज्ञानंदने उर्वरित सामन्यांमध्ये नियंत्रण राखत एकूण १५-१३ असा विजय मिळवला.

या ऐतिहासिक विजेतेपदासाठी प्रज्ञानानंदाला तब्बल दोन लाख अमेरिकन डॉलरचे बक्षीस मिळाले आहे. भारतीय बुद्धिबळासाठीही हा मोठा क्षण मानला जात आहे.

### जागतिक पटावर डंका

प्रज्ञानंदच्या या कामगिरीने भारतीय बुद्धिबळासाठी नवा इतिहास घडला आहे. विजयानंतर प्रज्ञानंदने या स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेनंतर ग्रँड चेस टुर ही जगातील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांपैकी एक असल्याचे त्याने म्हटले. या स्पर्धेचे विजेतेपद मिळवणे आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचेही त्याने सांगितले. विशेष म्हणजे, प्रज्ञानंदने प्रतिकूल परिस्थितीतून केलेले हे पुनरागमन त्याच्या मानसिक ताकदीचे आणि दबावाखाली खेळण्याच्या क्षमतेचे उत्तम उदाहरण ठरले आहे. भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात प्रज्ञानंदच्या या विजयाची नोंद आता एका ऐतिहासिक अध्यायाप्रमाणे झाली आहे.

# महिला हॉकी वर्ल्डकपमध्ये भारताचा जर्मनीवर शानदार विजय

**ॲमस्टेलवीन : वृत्तसंस्था**

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने शानदार कामगिरी करत पाचव्या स्थानावर शेवट गोड केला. पाचव्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात भारताने जागतिक क्रमवारीतील बलाढ्य जर्मनीचा ३-१ असा पराभव करत ऐतिहासिक विजय नोंदवला.

नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीनच्या वागेनर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सुरुवातीला दोन्ही संघांकडून सावध खेळ पाहायला मिळाला. पहिल्या दोन क्वार्टरमध्ये एकही गोल झाला नाही, मात्र सामन्याच्या तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने आक्रमक खेळ करत सामन्याचे चित्रच बदलून टाकले.

भारतासाठी इशिकाने ४३व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर अवघ्या



काही मिनिटांत भारताने जर्मनीवर आणखी दोन गोल केले. नवनीत कौरने ४४व्या आणि ४७व्या मिनिटाला सलग दोन गोल करत भारताची आघाडी ३-० अशी मजबूत केली. तीन गोलच्या पिछाडीनंतर जर्मनीने जोरदार पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. अखेर लिन क्रिंग्जने ५९व्या मिनिटाला जर्मनीसाठी एक गोल केला, मात्र भारतीय बचावफळीने शेवटच्या क्षणी कोणतीही मोठी चूक होऊ दिली नाही आणि सामना ३-१ असा जिंकला.

या संपूर्ण विश्वचषक मोहिमेत भारताने सातत्यपूर्ण कामगिरी केली. संघाने केवळ एक सामना गमावला, तर चीन, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने बरोबरीत राखले. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताने ६-१ असा मोठा विजय मिळवला, तर यजमान आणि ऑलिम्पिक विजेत्या नेदरलँड्सकडून भारताला ०-२ असा पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, भारतीय संघात ११ विश्वचषक पदार्पण करणाऱ्या खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे या युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या मिश्रणाने मिळवलेले पाचवे स्थान विशेष महत्त्वाचे ठरले.

१९७४च्या पहिल्या विश्वचषकात चौथे स्थान मिळवल्यानंतर भारताची ही विश्वचषकातील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. आता भारतीय संघाचे लक्ष पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेकडे असेल.

# नीरज चोप्राचे डायमंड लीग फायनलचे तिकीट पक्के

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने २०२६ डायमंड लीगच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. हंगामाची अंतिम फेरी ४ आणि ५ सप्टेंबर रोजी ब्रुसेल्स येथे आयोजित करण्यात येणार आहे.




दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता नीरजने या हंगामात डायमंड लीगच्या दोन टप्प्यांमध्ये सहभाग घेतला. त्याने १९ जून रोजी दोहा टप्प्यात ८५.६९ मीटरच्या प्रयत्नासह चौथे स्थान मिळवले होते. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी लॉझान टप्प्यात ८८.०५ मीटरची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी करत दुसरे स्थान मिळवले.

नीरज २७ ऑगस्ट रोजी ज्युरिख टप्प्यात सहभागी झाला नाही, जिथे पुरुषांची भालाफेक स्पर्धाही कार्यक्रमात समाविष्ट होती, मात्र लॉझानमधील त्याच्या कामगिरीने अंतिम फेरीत स्थान पक्के करण्यासाठी पुरेसे गुण मिळवून दिले. नीरजने या हंगामात ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतही ८५.८३ मीटरच्या थ्रोसह रौप्यपदक जिंकले होते.

नीरजचे लक्ष त्याच्या दुसऱ्या डायमंड ट्रॉफी विजेतेपदावर असेल. त्याने २०२२मध्ये डायमंड लीगचे विजेतेपद जिंकले होते आणि त्यानंतर तीन वेळा उपविजेता राहिला आहे.

# श्रीलंकेच्या सोनल दिनुशाने रचला इतिहास!

## भारताविरुद्ध पहिल्या दोन कसोटीत तीन शतके ठोकणारा पहिलाच फलंदाज

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतही सलग शतकी खेळी साकारत श्रीलंकेच्या सोनल दिनुशा याने कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एका सुवर्ण अध्यायाची नोंद केली आहे. कोलंबो कसोटीच्या दुसऱ्या डावात शतक झळकावताच भारताविरुद्धच्या आपल्या कारकिर्दीतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये तब्बल तीन शतके ठोकणारा तो जगातील पहिलाच फलंदाज ठरला. यापूर्वी कसोटी क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही फलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नव्हती.

गॉल कसोटीच्या पहिल्या डावात १०० आणि दुसऱ्या डावात ८४ धावांची खेळी करणाऱ्या सोनलने कोलंबो कसोटीतही आपली अप्रतिम लय कायम राखली. कोलंबो कसोटीच्या पहिल्या डावात त्याने २२३ चेंडूंत १०३ धावांची खेळी साकारली होती आणि त्यानंतर दुसऱ्या डावात नाबाद शतकी खेळी करत नवा विक्रम आपल्या नावे केला. या दोन




सामन्यांच्या कसोटी मालिकेत दिनुशा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला असून त्याने चार डावांमध्ये तब्बल ३८७ धावा कुटल्या.

याच सामन्यादरम्यान अर्धशतक गाठताच सोनलच्या नावावर आणखी एका ऐतिहासिक विक्रमाची नोंद झाली. भारताविरुद्धच्या कारकिर्दीतील पहिल्या चारही कसोटी डावांमध्ये ५०पेक्षा अधिक धावा करणारा तो जगातील पाचवा फलंदाज ठरला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये तब्बल ६७ वर्षांनंतर अशा विक्रमाची पुनरावृत्ती झाली आहे. यापूर्वी १९५९मध्ये इंग्लंडच्या केन बॅरिंग्टन यांनी भारताविरुद्ध आपल्या पहिल्या चार डावांत पन्नासहून अधिक धावा करण्याचा पराक्रम केला होता. त्याआधी इंग्लंडचे डग्लस जार्डिन (१९३२ ते १९३४), वेस्ट इंडिजचे एव्हर्टन वीक्स (१९४८) आणि क्लाइव्ह वॉलकॉट (१९४८) यांनी अशी कामगिरी नोंदवली होती. आता २०२६ मध्ये सोनल या दिग्गज फलंदाजांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे.

या ऐतिहासिक खेळीसह सोनल दिनुशा भारताविरुद्धच्या एकाच कसोटी सामन्याच्या दोन्ही डावांत शतके झळकावणारा श्रीलंकेचा तिसरा फलंदाज ठरला आहे. तब्बल २९ वर्षांनंतर श्रीलंकेच्या फलंदाजाकडून असा पराक्रम पाहायला मिळाला आहे. याआधी १९८२मध्ये चेन्नई कसोटीत दुलिप मेंडिस यांनी (१०५ व १०५) आणि १९९७मध्ये कोलंबोच्या मैदानावर अरविंद डी सिल्वा यांनी (१४६ व १२०) अशी दुहेरी शतकी कामगिरी केली होती. आता कोलंबोच्या याच मैदानावर दोन्ही डावात शतकी खेळी करत सोनलने हा अनोखा बहुमान संपादन केला आहे.

# टीम इंडियाचा डब्ल्यूटीसी फायनल गाठण्याचा मार्ग खडतर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धची दुसरी कसोटी अनिर्णीत राहिल्यानंतर ही मालिका जिंकूनही टीम इंडियाला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) दृष्टीने मोठा फटका बसला आहे. भारताचा फायनल गाठण्याचा मार्ग आता आणखी खडतर झाला आहे.

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने श्रीलंका दौऱ्यातील दोन सामन्यांची कसोटी मालिका १-० अशी खिशात घातली. कोलंबो कसोटीत फॉलोऑन लादल्यानंतर टीम इंडिया यजमान श्रीलंकेला क्लीन स्वीप देईल, अशी अपेक्षा होती, मात्र सोनल दिनुशाच्या जिगरबाज फलंदाजीच्या जोरावर श्रीलंकेने सामना अनिर्णित राखत भारताच्या विजयाच्या आशांवर पाणी फेरले.

टीम इंडियाने कोलंबोच्या मैदानातील सामना जिंकला असता तर त्यांना १२ गुण मिळाले असते आणि त्यांचा पीटीसी ६३.३३पर्यंत पोहचला असता. भारतीय संघाला डब्ल्यूटीसी गुणतालिकेत चौथ्या स्थानावर पोहचण्याची संधी होती, मात्र सामना अनिर्णित राहिल्याने भारत आणि श्रीलंकेला प्रत्येकी चार गुणांवर समाधान मानावे लागले. भारताचा पीटीसी ५३.३३वरून ५१.५२वर घसरला असून टीम इंडिया डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पाचव्या स्थानावर कायम आहे. दुसरीकडे, श्रीलंकेचा पीटीसी ३३.३३वर कायम असून डब्ल्यूटीसी फायनलच्या शर्यतीतील नऊ संघांमध्ये ते सहाव्या स्थानावर आहेत.

# ‘त्या’ नियमामुळे वैभव सूर्यवंशीला अंडर-१९ वर्ल्डकप संघात नो एन्ट्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेटचा उगवता तारा आणि अवघ्या १५ वर्षांचा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशी याला आगामी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंडर-१९ मालिकेसाठी भारतीय संघात स्थान मिळाले नाही. वयाने पात्र असूनही आणि वरिष्ठ राष्ट्रीय संघात पदार्पण केलेले असतानाही त्याला ज्युनिअर संघातून वगळण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते, मात्र या निर्णयामागे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) एक महत्त्वाचा नियम कारणीभूत ठरला आहे.

बीसीसीआयने २०१६मध्ये राहुल द्रविड यांच्या शिफारशीनुसार एक विशेष नियम लागू केला होता. या नियमानुसार कोणताही खेळाडू आपल्या कारकिर्दीत फक्त एकदाच अंडर-१९ विश्वचषकात सहभाग घेऊ शकतो. खेळाडूचे वय १९ वर्षांपेक्षा कमी असले, तरी त्याला दुसऱ्यांदा अंडर-१९ विश्वचषक खेळण्याची परवानगी दिली जात नाही.

वैभव सूर्यवंशीने २०२६च्या अंडर-१९ विश्वचषकात आधीच भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यामुळे बीसीसीआयच्या नियमानुसार तो आगामी अंडर-१९ विश्वचषकासाठी अपात्र ठरला आहे. अशा वेळी निवडकर्त्यांनी भविष्यातील विश्वचषकाची तयारी लक्षात घेऊन नवीन खेळाडूंना संधी देण्याच्या उद्देशाने त्याला या मालिकेतून वगळले आहे. यापूर्वी २०१६मध्ये वॉशिंग्टन सुंदरलाही याच नियमामुळे २०१८च्या अंडर-१९ विश्वचषकापासून दूर राहावे लागले होते.

# आसिफ खानवर १५ महिन्यांची बंदी

**दुबई :** संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) अनुभवी फलंदाज आसिफ खान याच्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) डोपिंग नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १५ महिन्यांची बंदी घातली आहे. आसिफवरील ही बंदी ८ सप्टेंबर २०२५पासून ७ डिसेंबर २०२६पर्यंत लागू असणार आहे.

आसिफच्या ८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या स्पर्धेबाहेरील डोपिंग चाचणीमध्ये मेस्टेरोलोन या प्रतिबंधित पदार्थाचा मेटाबोलाइट आढळून आला होता. त्यानंतर आयसीने या प्रकरणाची चौकशी केली. आसिफने आयसीसी अँटी-डोपिंग कोडच्या कलम २.१चे उल्लंघन केल्याचे मान्य केले आहे.

# शक्य होते ते सर्व केले, पण निरर्थक ठरले!


**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेच्या संघाने कोलंबोतील कसोटी सामना अनिर्णित राखत टीम इंडियाला मोठा धक्का दिला. भारतीय संघाने मालिका १-०ने जिंकली, पण फॉलोऑनची नामुष्की ओढावल्यानंतर यजमान संघाने अनपेक्षित कमबॅक करत टीम इंडियाला अक्षरशः तंगवले. कर्णधार शुबमन गिलनेही ते मान्य केले असून श्रीलंकन फलंदाजांना रोखण्यासाठी जे करायचे ते सगळे केले, पण सर्व निरर्थक ठरले, असे त्याने म्हटले आहे.

सामन्यानंतर गिलला विचारण्यात आले की, निकाल आपल्या बाजूने लागण्यासाठी टीम इंडियाला आणखी काही वेगळे करता आले असते का? यावर त्याने सांगितले, प्रामाणिकपणे सांगायचे तर काहीच वेगळे करता आले नसते. आम्ही सलग तीन दिवस जवळपास २५० षटके मैदानावर क्षेत्ररक्षण केले. आमच्याकडून जे काही शक्य होते, ते आम्ही सर्व केले. श्रीलंकेने खूप चांगला खेळ केला. त्यांच्या फलंदाजांनी अप्रतिम फलंदाजी केली. त्यांच्याकडे गुणवत्ता होती आणि नशिबाचीही थोडी साथ मिळाली. त्यामुळे आम्ही आणखी काही वेगळे करू शकलो असतो, असे मला वाटत नाही.

गिलने संघातील खेळाडूंचेही कौतुक केले. “संपूर्ण मालिकेत पडिक्कलने शानदार कामगिरी केली. केएल राहुल खूप चांगला खेळला. मानव सुथारने उत्कृष्ट गोलंदाजी केली आणि प्रसिद्ध कृष्णाने दोन्ही डावांत खूप मेहनत घेतली. आमच्या गोलंदाजांनी आपला पूर्ण जोर लावला,” असे गिलने सांगितले.

### दुसऱ्या कसोटीनंतर गिलची कबुली




“या मालिकेतून आमच्यासाठी अनेक सकारात्मक गोष्टी समोर आल्या. अगदी प्रतिस्पर्धी संघाकडूनही आम्हाला खूप काही शिकायला मिळाले. ज्या दबावाच्या परिस्थितीत ते होते आणि त्यांनी ज्या पद्धतीने पुनरागमन केले, ते शानदार होते. लंच आणि टी-टाइमदरम्यानही आम्ही याच गोष्टीवर चर्चा करत होतो की, यापेक्षा वेगळे आम्ही काही करू शकत नव्हतो.

**-शुबमन गिल,** भारतीय कर्णधार

# सूर्यकुमार यादवचा ‘मल्हारी स्टाईल’ भन्नाट डान्स



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय टी-२० संघाचा माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने मुंबईत झालेल्या प्रो गोविंदाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. या कार्यक्रमादरम्यान त्याने केलेल्या भन्नाट डान्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील फायनलमध्ये न्यूझीलंडला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला होता. या भारताचा लागोपाठ दुसरा टी-२० वर्ल्डकप विजय होता, पण ही स्पर्धा झाल्यानंतर त्याला कर्णधारपदावरुन काढून टाकण्यात आले आणि संघाबाहेरदेखील करण्यात आले. आता त्याने पुन्हा एकदा भारतीय संघात पुनरागमन करण्यासाठी कंबर कसली आहे.

दरम्यान, सूर्यकुमारची प्रो गोविंदा २०२६ स्पर्धेसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली होती. या स्पर्धेतील अंतिम फेरीचा थरार गुरुवारी रंगला. यादरम्यान सूर्यकुमारने हजेरी लावली. सूर्याने आपल्या हटके स्टाईलमध्ये एन्ट्री केली. एन्ट्रीच्या वेळी तो घेऊन टाक या गाण्यावर मल्हारी गाण्याची डान्स स्टेप करताना दिसला. त्यानंतर सूर्याने गोविंदांची भेटदेखील घेतली.

यादरम्यान सूर्यकुमारला भारतीय संघात पुनरागमन करण्याबाबतही प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी प्रश्नाचे उत्तर देताना तो म्हणाला, “हे बघा, मी तर पूर्ण मेहनत करतोय. जर सर्वकाही चांगले झालं, तर चांगलेच होईल.” सूर्यकुमारने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली होती, पण अमेरिकेविरुद्धचा सामना वगळता फलंदाज म्हणून तो आपली छाप सोडू शकला नव्हता.

केवळ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नव्हे, तर आयपीएल स्पर्धेतही त्याचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. या हंगामात त्याला काही सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करण्याची संधीदेखील मिळाली होती, पण या हंगामातील १३ सामन्यांमध्ये फलंदाजी करताना त्याने अवघ्या २०.७६च्या सरासरीने २७० धावा केल्या.

# चिगुरुपती वेंकट अंडर-१९ संघात

**पणजी : वृत्तसंस्था**

गोव्याचा युवा अष्टपैलू क्रिकेटपटू चिगुरुपती वेंकट याची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी भारताच्या १९ वर्षांखालील वनडे संघात निवड झाली आहे. ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा तीन वनडे आणि दोन बहुदिवसीय सामन्यांचा असेल.

वेंकटने मागील मोसमात देशांतर्गत वयोगटातील क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली. चार प्रमुख स्पर्धांमध्ये त्याने ४९ बळी घेत ३८० धावा केल्या. कूच बिहार करंडक स्पर्धेत गोव्याला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहचवण्यातही त्याचा महत्त्वाचा वाटा राहिला. या स्पर्धेत त्याने २६ बळी आणि २२४ धावा केल्या.

यापूर्वी श्रीलंका दौऱ्यासाठी भारताच्या १९ वर्षांखालील बहुदिवसीय संघातही त्याची निवड झाली होती. या मालिकेत त्याने प्रभावी कामगिरी करत दुसऱ्या सामन्यात पाच बळी घेण्याची कामगिरी केली.

भारत आणि ऑस्ट्रेलिया १९ वर्षांखालील संघांमधील तीन वनडे सामने १८, २१ आणि २३ सप्टेंबरला राजकोट येथे होतील. पहिला बहुदिवसीय सामना २७ ते ३० सप्टेंबरदरम्यान राजकोट, तर दुसरा सामना ५ ते ८ ऑक्टोबरदरम्यान अहमदाबाद येथे होणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com